cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com




बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९३ | शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

## न्यायालयाचे राज्यकर्त्यांच्या वर्मावरच बोट

निवडणुकीआधी राजकीय पक्षांकडून जाहीर केल्या जाणाऱ्या मोफत योजनांवर (रेवडी संस्कृती) सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नाराजी व्यक्त केली. देशवासीयांना मुख्य प्रवाहात आणून राष्ट्रीय विकासात सहभागी करून घेण्याऐवजी आपण परजीवी वर्ग निर्माण करत नाही का, असा रोखठोक सवाल करतानाच मोफत रेशन, पैसे मिळत असल्याने लोक काम करू इच्छित नाहीत, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्यकर्त्यांच्या वर्मावरच नेमके बोट ठेवले आहे.

# अखेर तूर हमीभावाने खरेदीला मान्यता !

## राज्यात २ लाख ९७ हजार टनाची होणार खरेदी

मुंबई । प्रतिनिधी

तुरीचे बाजारभाव पडल्यामुळे शेतकरी अडचणीत आले होते. मात्र सरकारने आता राज्यात तूर खरेदीचे उद्दीष्ट जाहीर करून खरेदी सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यात २ लाख ९७ हजार टन तूर खरेदीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. १३ फेब्रुवारीपासून खरेदीही सुरु करण्याच्या सूचना सरकारने संबंधित संस्थांना दिल्या आहेत. तसेच जिल्हानिहाय उत्पादकता निश्चित करून खरेदीची मर्यादा नेमून देण्यात आली आहे.



तुरीचा बाजारभाव आपल्या उच्चांकी दरापासून निम्मा झाला. तुरीने मागील काही महिन्यांमध्ये १२ हजारांचाही टप्पा पार केला होता. मात्र सध्या बाजारात तूर सरासरी ७ हजाराने विकली जात आहे. नवी तूर बाजारात दाखल झाल्यानंतर दरावर आणखी दबाव वाढण्याची भीती आहे. त्यामुळे भाव आणखी पडतील, याची भीती शेतकऱ्यांना होती. त्यासाठी सरकारने तातडीने हमीभावाने खरेदी सुरु करण्याची मागणी शेतकरी करत होते. शेजारच्या कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देत आधीच ३ लाख ६ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट जाहीर ठेवले होते. तसेच शेतकऱ्यांना क्विंटलमागे ४५० रुपये बोनसही जाहीर केला होता.

सरकारने यंदा तुरीसाठी ७ हजार ५५० रुपये हमीभाव जाहीर केला. मात्र सध्या बाजारात ७ हजारांच्या दरम्यान भाव मिळत आहे. तसेच सोयाबीनची खरेदी महाराष्ट्रात लांबल्याने तुरीची खरेदीही लांबत आहे. महाराष्ट्रात खरेदी जाहीर करण्यासच उशीर झाला. तसेच सध्या गोदामांची समस्या असल्याचे खरदी केंद्र चालक सांगत आहेत. सोयाबीन ठेवायलाही जागा नाही. सोयाबीनच्या खरेदी केंद्राबाहेर अनेक दिवस वाहने थांबून आहेत. त्यातच आता तूर खरेदी सुरु झाली. त्यामुळे तूर खरेदीतही अडचणी येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यासाठी सरकारने तातडीने गोदामांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे.

## भिकारी सुद्धा एक रुपया घेत नाही आम्ही एक रुपयात पीकविमा दिला

### कृषीमंत्र्यांचे अजब वक्तव्य

अमरावती । प्रतिनिधी

राज्यात १ रूपया पीक विमा घोटाळ्यावरून महायुती सरकारवर जोरदार टीका होत आहे. मागच्या काही दिवसांपूर्वी राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी एक वादग्रस्त विधान केले होते. यानंतर आता त्यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केल्याने चर्चा सुरू झाली आहे. हल्ली भिकारीसुद्धा १ रुपया घेत नाही. पण आम्ही १ रुपयात शेतकऱ्यांना पीक विमा दिला. असे वक्तव्य मंत्री कोकाटे यांनी केले. शुक्रवारी (दि.१४) अमरावतीमध्ये प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

मंत्री कोकाटे म्हणाले की, ''महायुती सरकारने १ रुपयात पीक विमा योजना सुरु केली.



परंतु, काहींनी त्याचा गैरफायदा घेतला. पीक विमा योजना यशस्वी होण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनाच लाभ मिळायला हवा. पीक विमा योजना सुरू झाल्यापासून महायुती सरकारला अनेक चांगले-वाईट अनुभव आले आहेत. पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांना लुटतात. सरकारला पीक विमा योजना बंद न ◀◀ पान २ वर

## आ.सुरेश धसांचे अवघ्या दोन तासात घूमजाव

### प्रदेशाध्यक्षांनी जेवायला बोलावले अन् अचानक धनंजय मुंडे तिथे आले

''भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मला जेवायला बोलावले होते. मी तिथे गेलो होतो, अचानकपणे तिथे धनंजय मुंडे साहेब आले. आमच्यामध्ये अर्धा तास चर्चा झाली'', असे भाजप आमदार सुरेश धस यांनी स्पष्ट करताना यापुर्वी केलेल्या वक्तव्यावरून दोन तासातच घूमजाव केले. मंत्री धनंजय मुंडे यांच्या भेटीबद्दलच्या चर्चा सुरू झाल्यानंतर सुरेश धस यांनी दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत खुलासा केला.

सुरेश धस म्हणाले, प्रदेशाध्यक्ष माझ्यापेक्षा फार मोठे आहेत, त्यांच्याकडून काही सांगण्यात चूक झाली असेल. परंतू त्यांनी आम्हाला हे मिटतंय का? अशा प्रकारचे वाक्य वापरले होते. मी क्लिअरकट त्यावेळीच सांगितले होते. त्यावेळी ते मनभेद नाहीत, मतभेद आहेत, असे म्हणाले आहेत. आमच्यामध्ये मतभेद आहेतच ना.. या प्रकरणाच्या बाबतीत मी माघार घेणार नाही. हे मी त्या बैठकीत क्लिअर सांगितले. ही बाब पंधरा-वीस दिवसांपूर्वीची आहे. पुढे बोलताना धस म्हणाले, मी जे पर्वा त्यांना भेटायला गेलो. एखाद्या माणसाला रात्री हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले आणि पुन्हा माघारी आणले म्हटल्यानंतर आपली संस्कृती आहे. त्या संस्कृतीप्रमाणे मी त्यांना भेटायला गेलो. यांच्या व्यतिरिक्त आमच्यामध्ये कोणतीही चर्चा नाही. त्यानंतर मी ७३ कोटींच्या बोगस घोटाळ्याचे पत्र मी अजित पवार यांच्याकडे पाठवले आहे. मी स्वत: कृषी कार्यालयात गेलो होतो. तेथील घोटाळ्याची मी कागदपत्र घेतली होती. आज देखील मी धनंजय देशमुख यांच्याशी बोललो आहे. मी मुंडे यांची भेट घेतली असली तरी संतोष देशमुख प्रकरणात मी लढत राहिल. मनोजदादा आमचे दैवत आहेत, गडबडीत काहीतरी बोलले असतील, मी त्यांच्याशी बोलेन, असे धस म्हणाले.

# राज्यात सेटींगचे राजकारण...!

## सुरेश धस यांनी धनंजय मुंडेंची भेट घेतल्याने खळबळ



### जरांगे पाटील, अंजली दमानिया आणि विरोधकांचा भेटीवर तिव्र आक्षेप

बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख खून प्रकरणात आक्रमक बाजू मांडणारे आ. सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याने खळबळ उडाली आहे. या भेटीला आ. धस यांनी दुजोरा दिला आहे. मुंडे यांच्या डोळ्याचे ऑपरेशन झाल्याने आपण त्यांची विचारपूस करण्यासाठी भेट घेतल्याचे त्यांनी सांगितले.

अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात सुरेश धस यांची आक्रमकता गेल्या काही दिवसांत महाराष्ट्राने पाहिली. आकाचा आका म्हणत सुरेश धस यांनी धनंजय मुंडेंना जेरीस आणण्याचा प्रयत्न केल्याचेही महाराष्ट्राने पाहिले. याशिवाय धनंजय मुंडे यांनी कृषीमंत्री असताना मोठे घोटाळे केल्याचाही आरोप त्यांनी केला. पण याच आक्रमक सुरेश धस यांनी थेट धनंजय मुंडे यांचीच भेट घेऊन खळबळ उडवून दिली आहे. धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतल्याचे सुरेश धस यांनी मान्य केले. मुंडेंचे डोळ्यांचे ऑपरेशन झाल्यानंतर धस त्यांना भेटायला गेले. तब्येतीची विचारपूस करण्यात काहीच गैर नसल्याचे धस यांचे म्हणणे आहे. पण मग त्यांनी केलेल्या आरोपांचे काय? दोघांमध्ये आता समेट झाला का, असे प्रश्न आता विचारले जात आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आम्ही मुंडे यांच्या निवासस्थानी चार साडे चार तास एकत्र होतो, असे म्हटले आहे. त्याचा मात्र धस यांनी इन्कार केला. झाकून लपून नाही, तर दिवसाढवळ्या मी त्यांना भेटलो. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली, असे धस म्हणाले. ही भेट घेतल्यामुळे देशमुख खून प्रकरणातून आपण माघार घेत आहोत, असा अर्थ काढण्याचे काहीही कारण नाही. दोन दिवसांपूर्वी बुधवारी आपण भेटलो. त्यानंतर आपल्या भूमिकेत काहीही बदल झालेला नाही, असे त्यांनी नमूद केले. आपल्यासोबत बावनकुळे होते, याचाही त्यांनी इन्कार केला. बावनकुळे काय म्हणाले हे त्यांनाच विचारा, अशी पुष्टी त्यांनी जोडली. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी या भेटीवर तीव्र नापसंती व्यक्त केली. ही भेट टाळायला हवी होती, असे जरांगे म्हणाले.

### सुरेश धसांनी विश्वास गमावला – सुषमा अंधारे

सुरेश धस हे धनंजय मुंडे यांना साडेचार तास भेटले की साडेचार मिनिटे भेटले हा मुद्दा महत्त्वाचा नाही. मुद्दा महत्त्वाचा आहे की, या धामधुमीमध्ये सुरेश धस असे करूच कसे शकतात? सुरेश धस बीडच्या जनतेचा विश्वास गमावत आहेत, असे शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. मला संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे वाईट वाटते ज्यांनी सुरेश धस यांच्यावर एवढा विश्वास टाकला असेही त्या म्हणाल्या. भाजपचे आमदार सुरेस धस आणि राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांची दोन वेळा भेट झाल्याच्या बातम्या आल्यानंतर त्यावर सुषमा अंधारेंनी प्रतिक्रिया दिली. ते फक्त स्वतःचा विश्वास गमवत नाहीत तर ते देवेंद्र फडणवीस यांची विश्वासार्हता सुद्धा गमावत आहेत, असे त्या म्हणाल्या.

### लोकांचा राजकारणावरचा विश्वास उठेल – दमानिया

हे अत्यंत चुकीचे आणि दुर्दैवी आहे. यावर आता मला धस यांना हेच सांगायचें आहे की, तुम्ही त्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्याचा शब्द दिला आहे. मग तुम्ही जर आता असे प्रकार केलेत तर हे चुकीचे होईल. पुन्हा तुम्ही असे करू नका ही मी तुम्हाला विनंती करत आहे. सेटींगचे राजकारण होत आहे. याकडे बघून खूप वाईट वाटत आहे. हे चाललेले राजकारण अतिशय खालच्या दर्जाचे आहे. सुरेश धस यांना विनंती आहे, तुम्ही असे करू नका लोकांचा राजकारणावरून विश्वास उठेल, असे दमानिया म्हणाल्या.

## गृहमंत्री अमित शहा यांच्याशी ३ नव्या कायद्याबाबत चर्चा – देवेंद्र फडणवीस

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

कमीत कमी वेळेत केसेस निकाली काढण्यासाठी प्रयत्न केले जातील. न्यायालयात जास्त तारखा मागता येणार नाहीत, असे कायदे तयार केले जातील, याबाबतच्या ३ नव्या कायद्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.१४) दिल्ली येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

ते पुढे म्हणाले की, तीन कायद्यांसंदर्भात ही बैठक पार पडली. ७ वर्षे शिक्षा असलेल्या प्रकरणात महाराष्ट्रात फॉरन्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यात येत आहे. प्रत्येक न्यायालयात क्युबिकल तयार करण्यात येईल. न्यायालयातील गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहे. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.५० क्विंटल | २,४०० | ३,१०० | २,७५९ |
| ज्वारी/हायब्रिड: २१.५० क्विंटल | १,८५१ | २,८५२ | २,२३० |
| मका/लोकल: ५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ३८.५० क्विंटल | ६,९५० | ७,१७६ | ७,०७७ |
| उडीद : १८.०० क्विंटल | २,६०० | ३,२३६ | २,९२८ |
| बाजरी: २.५० क्विंटल | २,३०० | २,८४० | २,६१६ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| सोयाबीन: ५२.५० क्विंटल | ३,९०० | ४,००० | ३,९६६ |
| हरभरा: ३१.५० क्विंटल | ५,३५० | ५,६०० | ५,५२० |

## जमीन घोटाळ्यातून वाचण्यासाठीच अंजली दमानिया सामाजिक कामाचा आव आणतात



मुंबई । प्रतिनिधी

तथाकथित सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया व त्यांचे पती अनिश दमानिया यांनी कर्जत वाकोला भागात

### दमानियांच्या जुन्या सहकाऱ्याने सगळंच काढलं

### कर्जत भागातील ६० एकर जमिनीचे दमानिया दांपत्याचे घोटाळे अन् नितीन चव्हाण यांचे ७५ प्रश्न

आदिवासींच्या ६० एकर जमिनी बळकावल्या आहेत. ही बाब २०११ च्या काळातील असून सदर प्रकरणी अण्णा हजारे यांच्या लोकपाल आंदोलनातील जुने सहकारी नितीन चव्हाण यांनी केलेल्या तक्रारी दाबून चौकशीतून सुटण्याच्या उद्देशाने अंजली दमानिया ह्या सामाजिक कार्यकर्त्या असल्याचा आव आणून ठराविक प्रकरणांमध्ये रस दाखवतात. त्यांना वाचण्यासाठी राजकीय वरदहस्त लाभावा केवळ यासाठीच त्या ठराविक नेत्यांना टार्गेट करतात, असा गौप्यस्फोट इंडिया अगेस्ट करपशन चे कार्यकर्ते व अंजली दमानिया यांचे जुने सहकारी नितीन चव्हाण यांनी एका वृत्त संस्थेस दिलेल्या मुलाखतीत केला आहे.

नितीन चव्हाण हे लोकपाल आंदोलनापासून अण्णा हजारे यांचे सहकारी राहिलेले आहेत. याच आंदोलनातून अंजली दमानिया ◀◀ पान २ वर

## सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील एक प्रमुख आरोपी सुदर्शन घुलेला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी घुलेच्या आवाजाचे नमुने घेतले असून, यामुळे त्याच्या अडचणींत चांगलीच वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आरोपी सुदर्शन घुले याच्यावर संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्येचा आरोप आहे. याशिवाय त्याच्यावर आवादा पवनचक्की कंपनीकडून २ कोटींची खंडणी वसूल केल्याचाही आरोप आहे. त्याची पोलीस कोठडी शुक्रवारी संपणार होती. तत्पूर्वी, सीआयडीचे उपअधीक्षक अनिल गुजर यांनी त्याला केज न्यायालयाच्या प्रथम वर्ग न्यायाधीश एस. व्ही. पावसकर यांच्या न्यायालयात हजर केले. तिथे त्याच्या पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली. यावेळी आरोपीचे वकील अनंत तिडके व सरकारी वकील जे बी शिंदे यांच्यात जोरदार युक्तिवाद झाला. त्यानंतर घुलेची रवानगी १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत करण्यात आली.

# आरटीई प्रवेश लॉटरी यादी जाहीर!

## पालकांना २८ फेब्रुवारीपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार


पुणे । प्रतिनिधी

आरटीई: शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत २५ टक्के प्रवेश वंचित आणि दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवण्यात येतात. ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक पद्धतीने पार पडत असते. आज या कायद्याअंतर्गत निवड यादी जाहीर झाली असून शासनाची अधिकृत वेबसाइट वर student.maharashtra.gov.in सोडत पाहू शकता.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना १४ ते २८ फेब्रुवारीपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली. सोडतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पडताळणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी राज्यभरातील सर्व गट शिक्षण अधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पडताळणी समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. एकट्या पुणे जिल्ह्यात आरटीई अंतर्गत ६१,६८७ अर्ज आले आहेत. तर ९६० शाळांमध्ये केवळ १८,५०७ जागा उपलब्ध आहेत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या देखरेखीखाली चालणाऱ्या या प्रक्रियेद्वारे पात्र विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेश मिळतो. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती राज्य सरकारकडून केली जाते. सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना कागदपत्रांची पडताळणी करावी लागणार आहे. यासाठी गट शिक्षण अधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पडताळणी समिती समोर पालकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केली जाईल. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रवेश नोंदविला जाईल. यानंतर अंतिम प्रवेश दिला जाईल.

### दोन वेळा मिळणार वाढीव मुदत

पालकांना पडताळणीसाठी जो वेळ ठरवून दिलेला आहे. त्यात प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. जे यात अपयशी ठरतील त्यांना दोन वेळा वाढीव मुदत देण्यात येईल. तसेच प्रक्रियेदरम्यान कागदपत्र चुकीचे आढळल्यास प्रवेश नाकारला जाईल.




cmyk

## अग्रलेख

# न्यायालयाचे राज्यकर्त्यांच्या वर्मावरच बोट

निवडणुकीआधी राजकीय पक्षांकडून जाहीर केल्या जाणाऱ्या मोफत योजनांवर (रेवडी संस्कृती) सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नाराजी व्यक्त केली. देशवासीयांना मुख्य प्रवाहात आणून राष्ट्रीय विकासात सहभागी करून घेण्याऐवजी आपण परजीवी वर्ग निर्माण करत नाही का, असा रोखठोक सवाल करतानाच मोफत रेशन, पैसे मिळत असल्याने लोक काम करू इच्छित नाहीत, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्यकर्त्यांच्या वर्मावरच नेमके बोट ठेवले आहे. निवडणुकीच्या तोंडावर फुकट वस्तूंची आश्वासने देऊन आपण 'परजीवी'पॅरासाईट्स) तयार करत आहोत का असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला. ही टिप्पणी करताना न्या. भूषण गवई यांनी थेट महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजने'चे उदाहरण दिले.

न्या. गवई म्हणाले, मागच्या काही वर्षांमध्ये निवडणुका जिंकण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंपासून रोख रकमेपर्यंत बरेच काही देण्याची आश्वासने देण्याचा पायंडा सर्वच राजकीय पक्षांनी पाडला आहे. त्यामुळे सत्तेत आल्यावर लोककल्याणकारी योजनांच्या नावाखाली जनतेला रेवड्या वाटण्याची प्रथा सर्वच सरकारांमध्ये सुरू झाली आहे. महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये लाडकी बहीण योजना सुरू आहे. या योजनेचे नियम अधिक कठोर केले जात असतानाच सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे राज्यात सुरू असलेल्या लाडकी बहीण योजनेवर गंडांतर येणार का, अशी चर्चा सुरु झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागातील गरिबी निर्मूलनाच्या मुद्यावर सुनावणी करताना सरकारी योजनांबाबत परखड टिप्पणी केली आहे. या रेवडी संस्कृतीमुळेच लोक काम करणे सोडून देत आहेत, लोकांना काम न करताच पैसे मिळत आहेत असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. न्या. बी. आर. गवई आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने म्हटले की, या रेवडी संस्कृतीमुळे लोक काम करण्यास अनुत्सुक बनले आहेत. त्यांना मोफत धान्य मिळते. तुम्हाला लोकांबाबत असलेल्या काळजीची आम्हाला जाणीव आहे. मात्र लोकांना मुख्य प्रवाहात आणून राष्ट्राच्या विकासात योगदान देण्यास प्रवृत्त करणे अधिक चांगले ठरणार नाही का, असा सवाल खंडपीठाने केला. शहरांमधील बेघर व्यक्तींना निवारा केंद्र सुरू करण्याबाबत दाखल याचिकेवर खंडपीठासमोर सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राजकीय पक्षांकडून दिल्या जाणाऱ्या 'मोफत'च्या आश्वासनांवर बोट ठेवले. बेघर लोकांबाबत तुमची काळजी आम्हाला समजते. मात्र याऐवजी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे अधिक चांगले नाही का? त्यांना देशाच्या विकासाचे वाटेकरी करण्याचे सोडून आपण परजीवींचा वर्ग तयार करत आहोत का, असा प्रश्न न्या. गवई यांनी केला. त्यावर एका याचिकाकर्त्याचे वकील प्रशांत भूषण म्हणाले की, काम असेल तर ते करायची इच्छा नसलेले देशात फार कमी लोक असतील. त्यावर न्या. गवई म्हणाले, तुम्हाला एकाच बाजूचे ज्ञान आहे. मी शेतकरी कुटुंबातील आहे. महाराष्ट्रात निवडणुकीपूर्वी झालेल्या मोफतच्या घोषणांमुळे शेतमजूर मिळेनासे झाले. बेघर लोकांसाठी निवारा केंद्रं असली पाहिजेत याबाबत सर्वांचेच एकमत असल्याची टिप्पणी न्यायालयाने सुनावणीदरम्यान केली. मात्र त्याचवेळी त्यामध्ये समतोल साधला गेला पाहिजे. मोफत योजनांमुळे कामगारांचा तुटवडा असल्याचे मत लार्सन अ‍ॅण्ड टुब्रोचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यन यांनी व्यक्त केले आहे. सरकारी योजनांमुळे लोक घराबाहेर पडत नाहीत परिणामी बांधकाम क्षेत्रामध्ये कामगारांचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवू लागला आहे. कर्मचाऱ्यांनी आठवड्याला ७० तास काम केले पाहिजे, या विधानामुळे चर्चेत आलेले सुब्रमण्यन एका परिषदेत बोलताना म्हणाले, जगभरात स्थलांतरितांची समस्या असताना भारतात मात्र वेगळेच चित्र आहे. इथे लोकांना बाहेर जायचे नसते अशी टिप्पणी त्यांनी केली.

नुकत्याच पार पडलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्षांनी 'रेवडी' आश्वासनांचा मारा केला. मोफत वीज, पाणी, अन्नधान्य, कर्जमाफी यासारख्या लोकानुनयाच्या घोषणांचा पंतप्रधान मोदी यांनी 'रेवड्या' असा उल्लेख केला आणि अशा घोषणा करणा-या राजकीय पक्षांवर खरपूस टीका केली. परंतु 'आपला तो बाळ्या अन् दुसऱ्याचे ते कार्ट' ही पंतप्रधानांची वृत्ती काही लपून राहिली नाही. कारण या निवडणुकीत मोफत योजनांचे आश्वासन देऊन भाजप २७ वर्षांनंतर सत्तेत आला. सध्या देशातील अनेक राज्ये दरमहा ठराविक आर्थिक मदतीसह अनेक मोफत योजना राबवत आहेत ही वस्तुस्थिती आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी स्थलांतरित अकुशल मजुरांना मोफत रेशन देण्याशी संबंधित प्रकरणावर सुनावणी करताना कठोर टीका केली होती. मोफत रेशन अजून किती दिवस वाटणार? त्यापेक्षा सरकार रोजगाराच्या संधी का निर्माण करत नाही असा सवाल न्यायालयाने केला होता. न्यायालयाने गतवर्षी मोफत योजनांशी संबंधित एका याचिकेवर सुनावणी करताना केंद्र सरकार व निवडणूक आयोगाला नोटीस पाठवली होती.

# वादग्रस्त विधान करणाऱ्या राहूल सोलापूरकर याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करा : एसएफआय

वडवणी । प्रतिनिधी

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल वादग्रस्त विधान करणाऱ्या राहूल सोलापूरकर याचा स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) तीव्र निषेध करत असून राहूल सोलापूरकर याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी एसएफआयच्या वतीन वडवणी तहसील कार्यलय येथे निवेदनाद्वारे करण्यात आली.



याबद्दल सविस्तर माहिती अशी की, सोलापूरकर याने छत्रपतींनी लाच देऊन औरंगजेबच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली होती, असे बिनडोक वक्तव्य केले. त्यानंतर त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्राम्हण होते, असे वक्तव्य केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि भाजपाशी जवळचे संबंध असणारा राहूल सोलापूरकर हा महामानवांबाबत सातत्याने बेताल वक्तव्य करत आहे.

संघ आणि भाजपाचे बाहुले असलेला राहुल सोलापूरकर हा जाणीवपूर्वक महामानवांबाबत वादग्रस्त वक्तव्य करून समाजातील शांतता, सुरक्षितता, अखंडता, सामाजिक सलोखा बिघडावून द्वेष, चीड आणि अशांतता निर्माण करत आहे. मुळातच इतिहासाची मोडतोड करून मनुवादी विचारधारेचा विरोधात असणाऱ्या महामानवांना बदनाम करून सामाजिक सलोखा व स्वास्थ्य बिघडवणे संघ आणि भाजपाची रणनिती राहिली आहे, त्याच विकृत रणनीतीचा भाग म्हणजे राहुल सोलापुरकरणे केलेले हे अनैतिहासिक वक्तव्य आहे, अशा बेताल वक्तव्य करणाऱ्या सोलापूरकर याच्यावर कडक कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी एफएसआयने वडवणी तहसील कार्यालय येथे निवेदनाद्वारे केली. यावेळी एसएफआयचे तालुकाध्यक्ष करण साळवे, तालुका सचिव अभिषेक अडागळे, उपाध्यक्ष करण भिसे, प्रदिप गलांडे, करण लोंढे, रुकमागत अजरट आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री फडणवीस सहकुटुंब महाकुंभमेळ्यात सहभागी, त्रिवेणी संगमात केले पवित्र स्नान

प्रयागराज - वृत्तसंस्था

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी (दि.१४) प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात पोहोचले. यावेळी त्यांनी सहकुटुंब त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले. प्रयागराज येथील अरैल घाटावर जाऊन त्यांनी संगमात आस्थेची पवित्र डुबकी घेतली. या संदर्भातील व्हिडिओ पीटीआयने पोस्ट केला आहे.

प्रयागराजमधील कुंभमेळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि मुलगी दिवीजा फडणवीस यांनी देखील त्रिवेणीच्या संगमात पवित्र स्नान केले. तसेच त्यांनी यावेळी त्रिवेणी संगम येथे आरती आणि प्रार्थना देखील केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १४४ वर्षांनंतर होणाऱ्या तीर्थराज प्रयागच्या महाकुंभाच्या भव्य समारंभाची व्यवस्था ही मुख्यमंत्री योगी आदित्यनाथजी यांच्या सरकारची ही एक मोठी कामगिरी आहे. एक हिंदू म्हणून मीही येथे पवित्र स्नान करण्यासाठी आलो आहे. अशी त्यांनी एक्स पोस्ट देखील केली आहे.

पान १वरून...

## गृहमंत्री अमित शहा यांच्याशी

न्यायालयात जास्त तारखा मागता येणार नाहीत. कमीत कमी वेळात केस निकाली काढण्यासंदर्भात भर दिला जाईल. पोलीस, कर्मचाऱ्यांना नव्या कायद्याबाबत प्रशिक्षण द्यावे लागणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. तहव्वूर राणा यांच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेने परवानगी दिली आहे. यासाठी पंतप्रधान मोदी यांचे आभार मानतो. आपण राणा यांची ऑनलाईन साक्ष घेतली आहे. त्यामुळे पाकिस्तानचा संबंध स्पष्ट करून दिला आहे. आता खऱ्या अर्थाने २६/११ च्या हल्ल्यातील लोकांना न्याय मिळेल, असे ते म्हणाले. दरम्यान, पंतप्रधान घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना थेट रक्कम देण्याचा पुण्यात २२ फेब्रुवारी रोजी कार्यक्रम होणार आहे. त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना देखील निमंत्रण दिले आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

## अंजली दमानिया बीड प्रकरणात

यांनी देखील सामाजिक कार्यकर्त्या म्हणून एन्ट्री घेतली होती. पुढे त्या अरविंद केजरीवाल यांच्या सोबत आम आदमी पक्षात गेल्या.

कर्जत भागात आदिवासींच्या ६० एकर जमीनी बेकायदेशीर मार्गाने बळकावल्या, एवढेच नव्हे तर त्या जमिनी जलसंपदा विभागाकडून एका प्रकल्पासाठी संपादित केल्या जाऊ नयेत यासाठी त्यांनी आदिवासींच्या इतर जमिनी त्या प्रकल्पासाठी संपादित करण्यासाठी तत्कालीन सरकारला आपले राजकीय वरदहस्त वापरून भाग पाडले. याबाबत शासनाच्या विविध यंत्रणांकडे आपण तक्रारी केल्या असून, त्याचे पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा देखील नितीन चव्हाण यांनी केला आहे. एवढेच नव्हे तर या प्रकरणात मदत करण्यावरुनच अंजली दमानिया यांनी तत्कालीन मंत्री नितीन गडकरी, अजितदादा पवार यांच्या वरती वेगवेगळे आरोप केले होते, असेही नितीन चव्हाण यांनी म्हंटले आहे.

अंजली दमानिया या आपले काळे कारनामे झाकून ठेवले जावेत, यासाठी ठराविक प्रकरणी ठराविक नेत्यांना सुपारी घेऊन टार्गेट करतात, त्यांचा हेतू साध्य झाला की त्या संबंधित प्रकरणातून एक्झीट घेतात, असा खुलासाही नितीन चव्हाण यांनी केला आहे.

नितीन चव्हाण यांनी आतापर्यंत इडी, मुख्यमंत्री, अँटी करपशन ब्यूरो, यांसारख्या अनेक यंत्रणा कडे याबाबत तक्रारी केल्या असून, एकही तक्रारीवर चौकशी किंवा कारवाई झाली नसल्याची खंत नितीन चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

बीड प्रकरणात ठराविक लोकांना मदत व्हावी, यासाठी अंजली दमानिया यांनी एन्ट्री घेतली, त्या जर सामाजिक कार्यकर्त्या आहेत, तर त्यांनी इथल्या प्रकरणात अधिकारी किंवा अन्य लोकांची जात का काढली? असा सवालही चव्हाण यांनी उपस्थित केला असून, बीड प्रकरणात आपण जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक तसेच पीडित देशमुख कुटुंबीयांना सुद्धा संपर्क करण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा नितीन चव्हाण यांनी केला आहे.

दरम्यान आपण सामाजिक कार्याचा आव आणून सुपारी घेऊन ठराविक हाय प्रोफाईल प्रकरणी ठराविक नेत्यांना टार्गेट करून आपल्या राजकीय वरदहस्तांचे काम करून देणाऱ्या अंजली दमानिया यांच्या कथित घोटाळ्यांचे, ते घोटाळे दाबण्यासाठी आपला नोकर मकरंद ते आणखी किती लोकांचे बळी दमानिया दांपत्याने दिले या सर्व बाबींचे पुरावे आपल्याकडे असून, आपले दमानिया दाम्पत्याला खुल्या चर्चेचे आव्हान असल्याचेही नितीन चव्हाण यांनी म्हंटले असून, त्यांनी अंजली दमानिया यांच्या विविध घोटाळ्यांच्या अनुषंगाने असलेल्या ७५ प्रश्नांचे उत्तरे दमानिया दांपत्याने द्यावेत, असे खुले आव्हान या मुलाखतीच्या माध्यमातून नितीन चव्हाण यांनी दिले आहे.

## भिकारी सुद्धा एक रुपया घेत

करता यात सुधारणा करायच्या आहेत''.''पीक विम्याबाबतीत शेतकऱ्यांमधील गैरप्रकार टाळण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतील. यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन योग्य निर्णय घेण्यात येणार आहे पीक विम्यातील ४ लाख अर्ज नामंजूर करण्यात आले. कृषी विभागामध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे आकृती बंद करून नवीन भरती संदर्भात शासन विचारात आहे''. असे कृषीमंत्री कोकाटे म्हणाले. ''पीक विमा प्रकारावरून सरकार कुठेही अडचणीत आलेलं नाही. पण ज्या पद्धतीने लोक अर्ज भरतात, कुठेतरी एजन्सी केंद्रवाले हे उद्योग करत असावेत असा माझा अंदाज आहे. त्याची चौकशी सुरु आहे, त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगितलं आहे. पण याच्यात सुधारणे करणे आवश्यक आहे''. असे मंत्री कोकाटे म्हणाले.

पान ६ वरून...

## मराठी पत्रकार परिषदेच्या

आहे. या निवेदनावर मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे ,विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## २ हजार १८३ विद्यार्थ्यांची

पडताळणी समिती कागदपत्रांची तपासणी करूनच विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करतील. विद्यार्थ्यांच्या नावापुढे ज्या दिनांकास विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी बोलविले आहे. त्या पालकांकडून मूळ कागदपत्रे व एक छायांकित प्रत पडताळणी समितीने देऊन कागदपत्रांची पडताळणी करत आपल्या पाल्यांचे प्रवेश निश्चित करायचे आहेत.

आरटीई ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२५ - २६ या वर्षाकरिता निवड यादीतील प्रवेश पात्र बालकांच्या पालकांना त्यांच्या मोबाईलवर एसएमएस प्राप्त होतील परंतु पालकांनी फक्त एसएमएस वर अवलंबून न राहता आरटीई पोर्टल वरील अर्जाची स्थिती या टॅब वर आपला अर्ज क्रमांक लिहून लॉटरी लागली अथवा नाही याची खात्री करावी .

## संत तुकाराम महाराजांचा विचार

होते. परिस्थिती बिकट असताना वारकरी संप्रदायात वाहून घेतले. स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले मात्र वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी उपाशी राहू दिला नाही. संत जोग महाराज यांची पुण्यतिथी असल्याने महाराजांनी नामस्मरण केले. जोग महाराजांनी वारकरी परंपरा समृध्द केली. त्यांच्या संस्थेतून संप्रदायाचा विस्तार झाला. त्या संस्थेमुळे एक शाखा होळ येथे निर्माण होऊ शकली. अभंगावर विवेचन करताना विनोद महाराज तपसे म्हणाले, संतांनी समाज जागृती करून दिशा दाखवण्याचे काम केले. त्यांचे समाजावर उपकार आहेत. संत कधीही खोटे बोलत नाहीत. अगदी संतांप्रमाणे मधुकर खाडे महाराज हे आपले जीवन जगले. त्यांची स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे मत व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांचे किर्तन**

होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत कार्यरत असताना औरंगपूर (ता.केज) येथील पावनधाम संस्थानचे प्रमुख ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांना मधुकर खाडे महाराज यांचा सहवास लाभला. त्यांच्या गंगापूजनानिमित्त आयोजित कीर्तन सप्ताह शनिवारी (दि.१५) ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांची किर्तन सेवा होणार आहे. या कीर्तनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गेवराईत दिव्यांग

शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा उद्घाटन होणार आहे. या उद्घाटन समारंभास मा.ना.अजित (दादा) पवार (मा उपमुख्यमंत्री, म.रा तथा पालकमंत्री, बीड), प्रमुख अतिथी म्हणून मा.ना.धनंजय मुंडे (मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, म.रा), मा.ना.पंकजाताई मुंडे (मंत्री, पर्यावरण व पशुसंवर्धन,म.रा.) तर विशेष अतिथी म्हणून मा.बजरंग सोनवणे (लोकसभा सदस्य) , मा.रजनीताई पाटील (राज्यसभा सदस्या), कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अविनाश पाठक (जिल्हाधिकारी बीड), प्रमुख उपस्थिती म्हणून मा.विक्रम काळे (विधान परिषद सदस्य) मा.सतिष चव्हाण (विधान परिषद सदस्य,म.रा) , मा.प्रकाश सोळंके (विधानसभा सदस्य, माजलगांव),मा.आ.सुरेश धस ( विधानसभा सदस्य आष्टी) मा.आ.नमिता मुंदडा (विधानसभा सदस्य, केज), मा.आ.संदिप क्षीरसागर (विधानसभा सदस्य, बीड), मा.आ.विजयसिंह पंडीत (विधानसभा सदस्य, गेवराई), हे उपस्थित राहणार आहेत. तर दि.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता भव्य क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराईचे तहसीलदार संदिप खोमणे , उपविभागीय पोलीस अधिक्षक नीरज राजगुरु, विशेष उपस्थिती म्हणून गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके , गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे एम.एस, गेवराईचे गटशिक्षणाधिकारी शिंदे डि.आर हे उपस्थित राहणार आहेत. तरी जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेस व सांस्कृतिक महोत्सवास उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने , ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्थेचे सचिव राजेश गोतावळे , जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी केले आहे.

# व्हॅलेन्टाईन डे च्या दिवशी घटना उघडकीस प्रियकराने खून करुन प्रेत शेतात पुरले

**जालना । प्रतिनिधी**

प्रियकराने प्रियसीचा खून करूणन, तिचे प्रेत शेतात पुरून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ही घटना व्हॅलेन्टाईन डे च्या दिवशी उघडकीस आल्याने खळबळ उडाली.

जालना शहरातील जमुनानगर भागात राहणारी तरुणी मोनिका सुमित निर्मळ (वय ३०) ही छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या आयुष्यमान रुग्णालयात आरोग्यसेविका म्हणून कार्यरत होती. पतीपासून विभक्त राहणारी मोनिका निर्मळ ही जालना येथे माहेरी आईसोबत राहून रेल्वेने दररोज छत्रपती संभाजीनगर अपडाऊन करीत होती. दि. ६ फेब्रुवारी रोजी संभाजीनगर येथे ड्युटीवर गेलेली मोनिका ही रात्री उशिरापर्यंत जालन्यात घरी आली नाही व तिचा मोबाईलही लागत नव्हता, त्यामुळे चिंतातूर झालेल्या आईने दुसर्या दिवशी थेट कदीम जालना पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानंतर दोन दिवसांनी मोनिकाच्या मोबाईलवरून तिच्या नातवाईकांना मी सुखरूप असून, मी लग्न केले असून, तुम्हाला एक वर्षांनी भेटायला येईल, अश्या आशयाचा मेसेज आला. या मोबाईल नंबरवर परत फोन केला तर तो पुन्हा लागलाच नाही, त्यामुळे नातेवाईकांच्या मनात शंकाकुशंका निर्माण झाल्या होत्या. नातेवाईकांनी थेट पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची भेट घेऊन, याप्रकरणात तात्काळ लक्ष घालण्याची मागणी केली होती.पोलीस अधीक्षक बन्सल यांनी याप्रकरणी कदीम जालना पोलीसांना तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना देताच पोलिसांची तपासचक्रे गतीने फिरली.कदीम जालना पोलिसांनी मोनिकाचा प्रियकर शेख इरफान शेख पाशा (रा. लासुर स्टेशन) यास ताब्यात घेऊन चार दिवसांपूर्वी जालना येथे आणून चौकशी केली होती, मात्र त्याने आपल्याला काहीच माहिती नसल्याचे सांगितल्याने त्याला सोडून दिले होते.

आरोपीला सोडून दिले असले तरी त्याच्या संशयास्पद हालचालींवर पोलिसांचे बारकाईनं लक्ष होते.पोलिसांनी इरफानच्या मोबाईलच्या कॉलडिटेल्सबरोबरच लासुर स्टेशन येथील काही सीसीटीव्ही फुटेज काढले होते.मोनिका हिच्यासोबतचे तासनतास केलेले मोबाईल संभाषण आणि ६ फेब्रुवारीला लासुर स्टेशन येथे फुटेजमध्ये मोनिका व इरफान दिसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे इरफान शेख याच्यावर अधिकच संशय बळावल्याने पोलिसांनी त्यास काल ताब्यात घेत, त्याला पोलिसी खाक्या दाखवताच, त्याने पोपटासारखे तोंड उघडले.संभाजीनगर रेल्वेस्थानकापासून रुग्णालयात येण्या-जाण्यासाठी तिच्याकडे असलेली दुचाकी ती रेल्वे स्थानकावरील वाहनतळावर उभी करीत असे. त्यादरम्यान, मोनिका हिचे वाहनतळावर काम करणार्या शेख इरफान शेख पाशा (वय ३५) नामक नराधमासोबत प्रेमसंबंध जुळले होते.इरफानला भेटण्यासाठी मोनिका ही ६ फेब्रुवारी रोजी रेल्वेने लासुर येथे गेली होती. लासुर येथून जवळच असलेल्या शेतात मोनिकाला घेऊन इरफान गेला होता.शेतात असलेल्या पडीत घरात असलेल्या लोखंडी अँगलला गळफास घेऊन तिने आत्महत्या केली असून, त्यानंतर तिचा मृतदेह त्याचठिकानी पुरल्याचे सांगितले होते.दरम्यान, आज कदीम जालना पोलीसांनी संभाजीनगर ग्रामीणच्या शिलेगाव पोलिसांची मदत घेत गंगापूरचे तहसीलदार यांच्या समक्ष इरफान याने पुरलेला मोनिका हीचा मृतदेह बाहेर काढला. त्यांनतर घटनास्थळीच वैद्यकीय अधिकार्यांना पाचारण करून उत्तरीय तपासणी करण्यात आली आहे. त्याठिकाणी मोनिकाच्या अंगावरील कपडे जाळल्याचेही आढळून आले आहे.दरम्यान, इरफान याने मोनिकाने आत्महत्या केल्याचा केलेला बनाव खोटा असून, त्यानेच फाशी देऊन खून करून, पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह पुरून टाकला असावा, असा अंदाज आहे. पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे, पोलीस अंमलदार नंदकुमार ठाकूर, दिलीप गायकवाड, शेख अन्सारी आदींनी शिलेगाव पोलिसांच्या मदतीने ही कामगिरी केली आहे.

# ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेस च्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुण उद्योजक बनणार - सुरेश पवार

आष्टी । प्रतिनिधी

येथील जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान येथे कृषी मंत्रालय भारत सरकार नाबार्ड आणि मॅनेज हैदराबादच्या माध्यमातून कृषी क्षेत्राशी निगडित असणाऱ्या शासकीय अनुदानातून उद्योजक बनण्याची संधी जयदत्त शिक्षण कृषी आणि जलविकास प्रतिष्ठान ने निर्माण केली यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले उद्योजक बनतील ही चांगली बाब असल्याचे प्रतिपादन विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन सुरेश पवार यांनी जयदत्त प्रतिष्ठान मध्ये ॲग्री क्लीनिक ॲग्री बिझनेस कोर्स च्या दहाव्या बॅचच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले कृषी मंत्रालय भारत सरकार, नाबार्ड आणि म्यानेज यांच्या वतीने आष्टी येथील जयदत्त प्रतिष्ठान येथे दीड महिन्याच्या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी बोलताना बाळासाहेब तळेकर म्हणाले कि जयदत्त प्रतिष्ठान मध्ये शिस्त, स्वछता, आणि वेळेच




महत्व हे पाहून येथून काही तरी तुम्ही शिकले पाहिजे शेतीशी निगडित व्यवसाय करून ग्रामीण भागातील आपण तरुण उद्योजक बनणार याचा शेतकऱ्यांना अभिमान वाटेल आणि आपण सुरू करणाऱ्या व्यवसायास माझ्या शुभेच्छा आहेत या प्रसंगी राजेंद्र लाड, सिताराम पोकळे, संस्थेचे अध्यक्ष तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, मिसाळ एल. एस. प्राध्यापक म्हस्के, समन्वयक विद्या पोकळे आदी उपस्थित होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२५



## जय भारत पदयात्रेचे आयोजन करणार

बीड। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी होत आहे. या निमित्ताने केंद्र शासनाने महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्हयामध्ये जय शिवाजी- जय भारत पदयात्रा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ही जय शिवाजी-जय भारत पदयात्रा ४ ते ५ कि.मी. इतक्या अंतराची आयोजित करुन यामध्ये औद्योगिक प्रतिष्ठाणे, महाविद्यालये, नवउद्योजक, शैक्षणिक संस्था, सांस्कृतीक वारसा जतण करणा-या बाबी तसेच शहरातील व राज्यातील महत्वपूर्ण बाबी यांचे प्रदर्शन होईल असा सर्वकष विचार करुन संदर्भ क्र. ३ नुसार बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळच्या सत्रात पदयात्रेचे आयोजन करण्यात यावे.

या अनुषंगाने सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी या पदयात्रेचे आयोजन जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हयातील मान्यवर,सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे,एन जी ओ,एन एस एस,एन वाय के, संस्था व यांच्याशी समन्वय साधून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार पदयात्रेचे आयोजन करण्यात यावे. संबधित अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन जय शिवाजी जय भारत पदयात्रा कार्यक्रमाचे आयोजन करावे असे महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक सेवा सहसंचालक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सव समारोहाचे १९ फेब्रुवारी रोजी आयोजन

## सहकारातील कार्यकर्त्यांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सहकार भारतीचे मार्गदर्शक सतीशजी मराठे यांच्या अमृत महोत्सव समारोहाचे बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या अभिष्टचिंतन सोहळ्यास सहकार क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वरराव देशमुख आणि बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर व स्थानिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

'बिना संस्कार नहीं सहकार' हे ब्रीदवाक्य असलेली 'सहकार भारती' ही सहकारी क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर काम करणारी एकमेव स्वयंसेवी संस्था आहे. १९७९ मध्ये स्थापन झाल्यापासून आजपर्यंत, सहकार भारतीचे कार्य २८ राज्ये आणि ६५० हून अधिक जिल्हा केंद्रांमध्ये विस्तारले आहे. आज सहकार भारतीचे अनेक कार्यकर्ते हे सहकारी क्षेत्रातील सर्वोच्च संस्थांमध्येही सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. सहकार भारतीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक प्रमुख कार्यकर्ते श्री.सतीश मराठे यांनी नुकतेच १ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. श्री.मराठे यांनी अनेक वर्षे सहकार भारती महाराष्ट्राचे सरचिटणीस म्हणून ही उल्लेखनीय काम केले आहे आणि आज ही ते एक सामान्य कार्यकर्ता म्हणून काम करीत आहेत.



काळानुसार, त्यांनी सहकार भारतीच्या राष्ट्रीय सरचिटणीस, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय संरक्षक इत्यादी महत्त्वाच्या पदांवर जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. या मालिकेत, श्री.मराठे यांना दुसऱ्यांदा आरबीआयचे संचालक होण्याची सुवर्णसंधी ही मिळाली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम करीत असताना, श्री.सतीश मराठे यांनी बँक ऑफ इंडियामधून त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरूवात केली. सहकार भारतीचे काम करण्यासाठी, श्री.मराठे यांनी सहकारीता क्षेत्रातील डोंबिवली नागरी सहकारी बँक आणि जनकल्याण सहकारी बँकेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडली. श्री.सतीशजी यांनी इंडियन बँक्स असोसिएशन आणि महाराष्ट्र आणि गोवा स्टेट ॲपेक्स बँकेचे संचालक म्हणूनही काम केले आहे. श्री.सतीशजी यांच्या अद्वितीय कार्याचा सन्मान करण्यासाठी, सहकार भारतीने बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईत श्री.सतीश मराठे अमृत महोत्सव सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरचिटणीस श्री.भैय्याजी जोशी हे उपस्थित असतील आणि विशेष अतिथी म्हणून इफकोचे व्यवस्थापकीय संचालक श्री.डॉ.उदय शंकर अवस्थी आणि केंद्रीय सहकार राज्यमंत्री श्री.मुरलीधर मोहोळ हे मान्यवर उपस्थित राहतील. या कार्यक्रमात माजी केंद्रीय मंत्री श्रीमान सुरेश प्रभू स्वागत समारंभाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. या समारोहात संपूर्ण भारतातील नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, साखर कारखाने, दूध संघ, मत्स्यव्यवसाय इत्यादी क्षेत्रातील १२०० हून अधिक सक्रिय कार्यकर्ते उपस्थित राहतील असा अंदाज आहे. हा कार्यक्रम बीएपीएस श्री स्वामी नारायण मंदिर, स्वामी नारायण चौक, दादर सेंट्रल रेल्वे स्टेशनसमोर, दादर (पूर्व) मुंबई - ४०००१४ या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आम्ही तुम्हाला मनापासून आमंत्रित करीत आहोत. असे डॉ.उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष), दीपक चौरसिया (राष्ट्रीय सरचिटणीस) यांनी कळविले आहे. तरी या गौरवपर कार्यक्रमास बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थिती द्यावी असे दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वरराव देशमुख, तथा बँकेच्या संचालिका शरयूताई हेबाळकर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

## वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

### ढोरगावच्या सरवदे कुटुंबाचा उपक्रम



माजलगाव। प्रतिनिधी

वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून ढोरगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव विठ्ठलराव सरवदे यांच्या कुटुंबीयांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

शहरा पासून जवळच असलेल्या ढोरगाव येथील पोलीस पाटील कै. विठ्ठलराव सरवदे यांच्या पंधराव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे मुलं माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे आडत व्यापारी साहेबराव सरवदे प्रतिष्ठित शेतकरी छगनराव सरवदे डॉक्टर सदाशिव सरवदे या चार मुलांनी व त्यांच्या कुटुंबियांनी इतर खर्चाला फाटा देऊन जिल्हा परिषद शाळा लाहामेवाडी येथील विद्यार्थ्यांना दि.१३ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमास च्या अध्यक्षस्थानी सरपंच अशोकराव वाघमारे होते तर उद्घाटक म्हणून सेवानिवृत्त बि.डि.ओ. सुभाषराव गडदे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक ओंकार खुरपे शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले माजी उपनगराध्यक्ष सतीश शेठ दुगड उद्योजक संपतराव हराळ मल्हार पतसंस्थेचे चेअरमन विशाल देवकते सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवानराव धरपडे, सेवानिवृत्त कर्मचारी अशोकराव देवकते, मल्हार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव डोने, मुंजा हरी चिंचोलकर तुकाराम यमगर चंद्रकांत कापसे माणिकराव मदने गोपीनाथ मदने प्रकाश हांडे, शाळेचे मुख्याध्यापक शेख वहाब सहशिक्षक थेटे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नॅशनल अबॅकस स्पर्धेत एस. के. एस. कोचिंग व अबॅकस क्लासेसचे अभूतपूर्व यश

बीड । प्रतिनिधी

संस्कार कॉलनी बीड येथील नामांकित एस के एस कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल अबॅकस स्पर्धेत अबूतपूर्व यश संपादन केले. यामध्ये सर्वच सहभागी विद्यार्थ्यांनी सर्वोत्तम प्रदर्शन करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली.

एस के एस कोचिंग क्लासेस ने देश पातळीवर प्रथम क्रमांक मिळवत सर्वोत्तम पारितोषिकावर देखील नाव कोरले

सिद्धी घोडके या विद्यार्थिनीने देश पातळीवर प्रथम क्रमांक मिळवत सर्वोत्कृष्ट असण्याचा मान तसेच सर्वात मोठी ट्रॉफी आणि प्रथम क्रमांकासाठी मिळणारे सर्वोत्तम पारितोषिक सायकल जिंकत एस के एस क्लासेसच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्याचे काम केले.

देशभरातून एकूण २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेली ही स्पर्धा कोल्हापूर येथे पार पडली यामध्ये क्लासेसच्याही २९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यामधील ११ विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट प्रदर्शनासाठी देश पातळीवरील विविध रँक देण्यात आले तसेच इतर विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्कृष्ट प्रदर्शनासाठी बेस्ट परफॉर्मर या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. जिद्द एकाग्रता व चुकता या सर्व गुणांचा एकाच वेळी वापर करून विद्यार्थ्यांनी अगदी पाच मिनिटांपेक्षाही कमी वेळेत १०० गणिते सोडवून एक नवा विक्रम प्रस्थापित केला.




स्पर्धेत विजयी झालेले विद्यार्थी

सिद्धी घोडके देशात प्रथम क्रमांक, सिया मस्के देशात तृतीय क्रमांक, अथर्व नाईकवाडे देशात तृतीय क्रमांक, स्वीटी व्हराट देशात सहावा क्रमांक, सोनल चव्हाण - सातवा क्रमांक, रुद्र नवले - नववा क्रमांक, आरुष दराडे - नववा क्रमांक, श्वेता मस्के - नववा क्रमांक, साक्षी पेजगुडे - दहावा क्रमांक, शौर्य घोडके - बारावा क्रमांक, धनराज पांचाळ - चौदावा क्रमांक, तसेच इतर सर्व विद्यार्थी हे सर्वोत्कृष्ट प्रदर्शनामुळे त्यांना देखील पारितोषिक प्राप्त झालेले आहे अशा सर्वच विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून पालक , शिक्षक व इतर सर्वच व्यक्ती कौतुक करत आहेत व विविध माध्यमातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे तसेच या सर्व निकालामागे क्लासेसचे संचालक यांची भरपूर मेहनत व जिद्द व प्रयत्न पूर्ण पूर्वक घेण्यात आलेला अतिरिक्त सराव ही असल्याची भावना देखील पालक वर्गातून समोर येत आहे पालकांनी संचालक शेख सर यांचा देखील पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या निकालामुळे शिक्षकांचा सत्कार होत असेल तर याच पद्धतीची मेहनत सर्व क्षेत्रात पुढेही चालू राहील असे मत संचालक शेख इमरान सर यांनी बोलून दाखवले व पुढेही विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रात काम करत राहण्याचे मानस बोलून दाखवला लवकरच

बीड जिल्ह्यातील सर्वच अबॅकस विद्यार्थ्यांसाठी एक जिल्हास्तरीय भव्य स्पर्धा घेण्याचे नियोजन असल्याचा देखील मानस सरांनी बोलून दाखवला त्या पद्धतीने जिल्ह्यातील सर्वच शाळेतील विद्यार्थ्यांनी आत्तापासूनच तयारीला लागावे व आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय अबॅकस स्पर्धेत सहभागी होऊन भरघोस बक्षीसे जिंकावीत असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

## अंबाजोगाई बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी व पर्स चोरी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

शहरातील बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत प्रवाशांचे दागिने व रोख रक्कम चोरीच्या घटना समोर आल्या आहेत.प्राप्त माहितीनुसार, दिनदयाळ कॉलनी येथील रहिवासी व खोलेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक सतिष सुरेशराव हिवरेकर यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे मेव्हणे श्री. राजेंद्र मधुकरराव पानसरे (रा. फरांदेनगर, नांदेड) हे अंबाजोगाई येथे आले होते. त्यांना लातूरला जाण्यासाठी बसस्थानकावर सोडण्यासाठी प्राध्यापक हिवरेकर व त्यांचा चुलत भाऊ निलेश हिवरेकर दुपारी ४ वाजता बसस्थानकात गेले.

मेव्हणे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे १७-१८ ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरी केली. घटनेनंतर बसमध्ये तसेच परिसरात चोराचा शोध घेतला असता कोणताही संशयित आढळून आला नाही. याच दरम्यान, सय्यद आलिमा अकबर (रा. धानोरा खुर्द) या युवतीची देखील पर्स चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला. अंबाजोगाई-आपेगाव बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्सची चोरी केली. सदर पर्समध्ये १,००० रुपये रोख, बस पास, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड व पोस्ट डेबिट कार्ड होते.

या दोन्ही घटनेची तक्रार प्राध्यापक सतिष हिवरेकर व सय्यद आलिमा अकबर यांनी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. गर्दीचा फायदा घेत बसस्थानक परिसरात चोरीच्या घटना वाढत असल्याने प्रवाशांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## रिपाइं जिल्हाध्यक्षपदाची सोपविली धुरा!

### बाळासाहेब काकडे यांचे होतेय सर्वत्र अभिनंदन

बीड/प्रतिनिधी

आंबेडकरी चळवळीतील कामाची दखल घेत, संघरक्षित उर्फ बाळासाहेब पांडुरंग काकडे,यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.तशी घोषणा रिपाइंचे राज्य अध्यक्ष जक्कपा कांबळे, मराठवाडा प्रदेश अध्यक्ष पंडित टोमके यांनी केली. त्यामुळे त्यांच्यावर कामाची आणखीनच जबाबदारी वाढली आहे.

बीड शहरातील शासकीय विश्रमगृह येथे, नुकतीच रिपाइं पदाधिकारी यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत रिपाइंचे राष्ट्रीय नेते डॉ.राजेंद्र गवई यांच्या आदेशानुसार बाळासाहेब काकडे यांची निवड करण्यात आली.यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जक्कपा कांबळे, मराठवाडा प्रदेश अध्यक्ष पंडित टोमके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरचे जिल्हाध्यक्ष धर्मा माने, सोलापूर शहर प्रमुख बिराजदार, गायकवाड, उपस्थित होते. या महत्वपूर्ण बैठक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरे यांनी केले.यावेळी भारत शिरसाट, टाकणखार, जीवक जाधव, मगर, साहेबराव काकडे, संजय शिरसाट,पप्पू काकडे, पंकज जाधव, आरुष मोरे,संजय ठोकळ, भीमराज ठोकळ, अक्षय मस्के, आशिष जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान यावेळी बीड शहर अध्यक्ष म्हणून धीरज वडमारे यांची निवड करण्यात आली.



# अँपा डॉक्टर्स व्हॉलीबॉल चॅम्पियन चषक स्पर्धेत 'अँपा स्मॅशर्स' संघास विजेतेपद

## कर्णधार डॉ. राजेश इंगोले यांना सामनावीर तर डॉ.संदीप जोगदंड मालिकावीर पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई मेडीकल प्रकटीशनर्स असोसिएशनच्या वतीने प्रथमच अंबाजोगाईतील सर्व डॉक्टर्स साठी व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन मानवलोक येथील व्हॉलीबॉल मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या व अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ कर्णधार असलेल्या डॉ राजेश इंगोले यांच्या अँपा स्मॅशर्स संघाने पहिले विजेतेपद पटकावले तर डॉ प्रदीप सोनवणे यांच्या लेजेन्ड्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या अंतिम सामन्यात अँपा स्मॅशर्सचे कर्णधार डॉ राजेश इंगोले यांनी नेतजवळ अत्यंत उत्कृष्ट खेळ करत आपल्या संघाचा विजय सुकर केला. त्यांच्या या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्यांना अंतिम सामन्यात 'सामनावीर' पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले तर संपूर्ण स्पर्धेत संघासाठी सेन्टर खेळणाऱ्या डॉ संदीप जोगदंड यांना मालिकावीर पुरस्कार देण्यात आला. स्पर्धेच्या उपविजेत्या संघाचे कर्णधार डॉ प्रदीप सोनवणे यांनीही झुंजार खेळ करत आपल्या संघास विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला.



कार्यक्रमाचे उदघाटन सकाळच्या सत्रात डॉ सुलभा खेडगिकर आणि डॉ मिसेस एस यु पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तर पारितोषिक वितरण अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी व मानवलोकचे सहकार्यवाहक समाजसेवक अनिकेत लोहिया यांच्या हस्ते करण्यात आले.उदघाटन प्रसंगी बोलतांना डॉ सुलभा खेडगीकर यांनी जीवनात आरोग्याला अनन्य साधारण महत्व आहे त्यामुळे आरोग्य निरोगी राहण्यासाठी विविध प्रकारचे खेळ खेळले पाहिजेत. डॉ सौ एस यु पाटील यांनी कला व क्रीडा कौशल्य जीवनात आनंद निर्माण करतात आणि अशी आनंदी माणसे समाजात वावरताना समाजातही सकारात्मक ऊर्जा निर्माण करत असतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ राजेश इंगोले आहेत असे सांगत डॉ इंगोले विविध व्यासपीठांवर, विविध गायन स्पर्धेत, विविध सांस्कृतिक कार्यक्रमात, विविध खेळ प्रकारात सक्रिय सहभाग नोंदवतात. त्यामुळे त्यांची देहबोली आणि व्यक्तिमत्व इतरांना आवडत आणि त्यांच्या सोबत राहील की जीवनाचा इतर ताण आपोआप विसरला जातो असे सांगत आपल्या जीवनात आनंद आणि समृद्धता आणण्यासाठी सर्वांनी ह्या गोष्टीचे अनुकरण करावे असा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात अध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांनी अँपा संघटनेमार्फत अँपाच्या अध्यक्ष डॉ सुलभा पाटील ,खेळ सचिव डॉ बी डी माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धांचे कौतुक करत अंबाजोगाईत प्रथमच अशा प्रकारच्या स्पर्धा डॉक्टर्स साठी ठेवण्यात आल्या याबद्दल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. सर्व पॅथीचे डॉक्टर्स एकत्र येऊन विविध क्रीडा कौशल्यांमध्ये आपले खेळगुण दाखवून समाजानेही आरोग्यप्रति सजग राहावे हा संदेश आपल्या अनुकरणाने देतात हे अत्यंत महत्वाचे आहे असे प्रतिपादन करत विजेत्या संघाचे कर्णधार डॉ राजेश इंगोले ,मालिकावीर डॉ संदीप जोगदंड आणि उपविजेत्या संघाचे कर्णधार डॉ प्रदीप सोनवणे यांचे कौतुक केले. मानवलोकचे सहकार्यवाहक अनिकेत लोहिया यांनी सर्व डॉक्टर्स आपल्या सेवा कर्तव्यात इतके व्यस्त असतात की रुग्णसेवा करताना आपली तहानभूक,आपलं वैयक्तिक कौटुंबिक आयुष्य, आपली शारीरिक तंदुरुस्ती या कडे सपशेल दुर्लक्ष करतात याचे परिणाम म्हणून त्यांना रक्तदाब, डायबेटीस अशा व्याधी इतरांच्या मानाने लवकर सुरू होतात. हे टाळण्यासाठी सर्व डॉक्टर्सनी आपली शरीरसंपदा व्यवस्थित ठेवण्यासाठी, शरीराला ऊर्जा देण्यासाठी शारीरिक व्यायाम करणे आवश्यक आहे असे सांगितले. विजेत्या अँपा स्मॅशर्स संघाचे कर्णधार डॉ राजेश इंगोले यांनी अँपा संघटनेच्या अध्यक्षा डॉ सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ सुनील नांदलगावकर,सचिव डॉ ऋषिकेश घुले, क्रीडा सचिव डॉ बी डी माळवे, सांस्कृतीक सचिव डॉ संदीप जैन, डॉ विवेक मुळे, डॉ मनीषा पवार यांचे या अभूतपूर्व स्पर्धा सर्व डॉक्टर्सना एकजीव करणाऱ्या ठरल्या आहेत, खेळात खेळणारे खेळाडूमध्ये एकमेकाप्रति सहकार्य आणि प्रेमाची भावना वृद्धिंगत झाली आहे. तसेच या स्पर्धांमुळे एक वेगळ्या प्रकारच्या उत्साहाचा आणि ऊर्जेचा अनुभव सर्व पॅथीच्या डॉक्टर्स मध्ये संचार झाला आहे असे म्हणत या स्पर्धा यशस्वी केल्याबद्दल सर्व संयोजकांचे अभिनंदन केले. अँपा संघटनेच्या अध्यक्ष डॉ सुलभा पाटील यांनी खेळात सहभागी सर्व डॉक्टर्सचे, विजेत्या, उपविजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करत यापुढेही संघटनेतर्फे येणाऱ्या काळात डॉक्टर्स साठी विविध सांस्कृतिक व इतर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील असे सूतोवाच केले. अँपा संघटनेचे क्रीडा सचिव डॉ बलभीम माळवे यांनी प्रास्तविक करतांना या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सर्व डॉक्टर्स खेळाडूंनी सहभाग नोंदवत या स्पर्धा यशस्वी केल्या याबद्दल कौतुक करत यापुढेही अशाच दर्जेदार स्पर्धा घेणार असे आश्वासन दिले. सामन्यांसाठी पंच म्हणून राष्ट्रीय खेळाडू संतोष कदम तर स्कोरर म्हणून डॉ ऋषिकेश घुले यांनी काम पाहिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ सुनील नांदलगावकर तर आभार प्रदर्शन डॉत्र संदीप जैन यांनी केले.

cmyk

# प्रत्येक गावस्तरावर होणार पर्जन्यमानाची नोंद

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची घोषणा

नागपूर : पीक नुकसानीनंतर पर्जन्यमान व तत्सम नोंदीचा अपेक्षित डाटा उपलब्ध होत नाही. त्याची गांभीर्याने दखल घेत लवकरच राज्यातील सर्वच गावांमध्ये पर्जन्यमापन आणि हवामान केंद्राची उभारणी केली जाईल. गावस्तरावर डिजिटल डिस्प्ले बोर्ड लावले जाणार असून त्यावरून हवामान विषयक माहितीसोबतच कृषी तंत्रज्ञानाशी संदर्भात बाबींच्या प्रसारावर भर दिला जाईल, अशी घोषणा कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली.

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती) येथे आयोजित प्रगतिशील शेतकऱ्यांशी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कृषी आयुक्त सूरज मांढरे, गुणनियंत्रण संचालक सुनील बोरकर, पाणी फाउंडेशनचे अविनाश पोळ, कृषी आयुक्ताचे स्वीय्य सहाय्यक संतोष पाटील, विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे यांची या वेळी उपस्थिती होती. नागपूर विभागाच्या सहा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या वेळी विविध समस्या मांडल्या. त्यामध्ये भात, सोयाबीन, कपाशी तसेच संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश होता. पुढे बोलताना कृषिमंत्री म्हणाले, की प्रत्येकी अडीच किलोमीटर अंतरावर पर्जन्यमान व्हावे, असा प्रस्ताव आहे. त्यासोबतच गावस्तरावर



हवामान केंद्राचा प्रस्ताव आहे. लवकरच हे काम सुरू होईल. हवामान विषयक माहिती रोजच्या रोज उपलब्ध व्हावी याकरिता डिजिटल डिस्प्ले बोर्ड गावागावांत लावले जातील. त्यावरून हवामान सोबतच कृषी विषयक सल्ला प्रसारित केला जाईल. कृषी विस्तार क्षेत्रात यातून मोठे परिवर्तन होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. वन्यप्राण्यांचा त्रास वाढला आहे. त्यामुळे या विषयावर केंद्रीय आणि राज्य वनमंत्री यांच्याशी संयुक्त बैठकीत चर्चा करून निर्णय घेतला जाईल. वनविभागाने त्यांचे क्षेत्र कुंपणाने संरक्षित केले आणि त्या ठिकाणी प्राण्याकरिता चारा-पाण्याची सोय केल्यास वन्यप्राण्यांकडून होणारे नुकसान कमी होणार आहे. अतिसघन कापूस लागवडीचे मोठे यश असतानाही कृषी विद्यापीठाने त्यांच्या प्रक्षेत्रावर याचे डेमो का घेतले नाहीत? अतीसघन कापूस लागवड प्रकल्पात अकोला कृषी विद्यापीठाच्या पिछाडीवरही त्यांनी चिंता व्यक्त केली.

संत्रा उत्पादकांनी या वेळी इंडो-इस्त्राईल पद्धतीने कापूस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीच अनुदान उपलब्ध व्हावे, अशी मागणी केली. त्यासोबतच काटोल येथील कृषी उद्योग विकास मंडळअंतर्गत असलेला संत्रा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करावा, अशी मागणीही रेटण्यात आली.

### कृषी सहायकांना लॅपटॉप

गावस्तरावर कृषी सहायकांना लॅपटॉप दिले जाणार आहेत. त्यातून कामाची गती वाढेल. येत्या आठवडाभरात लॅपटॉप वितरणाचे काम पूर्णत्वास जाणार आहे. त्याकरिता निविदा प्रक्रिया देखील झाली असल्याचे कृषिमंत्री माणिक कोकाटे यांनी सांगितले. त्यासोबतच गावस्तरावर कृषी सहायकांचे कार्यालय उभारले जाणार आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांची ऑनलाइन कामे सुलभपणे होतील, असा विश्वासही कृषिमंत्र्यांनी व्यक्त केला.

### डीबीटी धोरणात होणार बदल

सध्या डीबीटीवर अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्या पार्श्वभूमीवर डीबीटी प्रणालीत बदल केला जाणार आहे. 'पहिले या पहिले घ्या,' असे धोरण याकरिता राहील. पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्याने पंधरा दिवसांत कागदपत्रांची पूर्तता करावी, असे अपेक्षित आहे. पंधरा दिवसांनंतर यादीतील दुसऱ्या क्रमांकाच्या शेतकऱ्याला लाभ दिला जाईल, असे ते म्हणाले.

# शाश्वत शेतीमध्ये सेंद्रिय कर्बाचे महत्व



गेल्या ७० वर्षांत भारतातील जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण १ टक्क्यांवरून ०.३ टक्क्यांपर्यंत घसरले आहे, ही कृषी क्षेत्रासाठी चिंतेची बाब आहे. सेंद्रिय कर्ब हा मातीतील सेंद्रिय पदार्थाचा मुख्य घटक आहे आणि मातीला पाणी धरून ठेवण्याची क्षमता, रचना आणि सुपीकता देतो. जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी झाल्यामुळे पिकाची उत्पादकता कमी होते, त्यामुळे जमिनीत असलेल्या फायदेशीर सूक्ष्मजीवांची संख्या देखील कमी होत आहे जे वनस्पतींना पोषक तत्वे पुरवण्यास मदत करतात. शाश्वत आणि विषमुक्त शेतीसाठी शेतकऱ्यांनी कीटकनाशके आणि रासायनिक खतांवर अवलंबून राहणे कमी केले पाहिजे. केवळ सेंद्रिय खते जमिनीची उत्पादकता आणि सेंद्रिय कर्बाची पातळी वाढवू शकतात.

सेंद्रिय कर्ब म्हणजे काय ? सेंद्रिय पदार्थामध्ये असलेल्या आवश्यक कार्बनला सेंद्रिय कर्ब असे म्हणतात. सेंद्रिय कर्बामुळे जमिनीचे आरोग्य तर वाढतेच, शिवाय पीक विषमुक्त होऊन अधिक उत्पादन मिळण्यासही मदत होते.

सेंद्रिय कर्बाची गरज का आहे ? जमिनीतील जैवरसायन संतुलन राखण्यासाठी सेंद्रिय कर्ब महत्त्वाचा आहे. त्यामुळे पिकामध्ये नायट्रोजन, स्फुरद, झिंक अशा अनेक पोषक तत्त्वांची उपलब्धता आहे. सेंद्रिय कार्बच्या उपलब्धतेमुळे जमिनीतील फायदेशीर जिवाणूंची संख्या झपाट्याने वाढू शकते आणि हे फायदेशीर जिवाणू पिकांना सूक्ष्म अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्यास मदत करतात. ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते आणि पिकाची उत्पादकता आणि गुणवत्ता लक्षणीय वाढ दिसते. तसेच ते सक्रियरित्या जमिनीची जैवविविधता टिकवून ठेवण्यास मदत करते. सेंद्रिय कर्बामुळे मातीची रचना, सच्छिद्रता तसेच मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारते आणि हवा, पाणी यांना जमिनीत खेळते ठेवते. हे पिकाच्या फांद्याच्या वाढीस गती देते, मुळे विकसित करते, संपूर्ण झाडाच्या आत अन्नद्रव्य आणि पाणी घेण्यास सक्रियपणे सहकार्य करते. त्यामुळे पिकामध्ये रोग प्रतिकारशक्ती वाढते, त्यामुळे पिकाचे जास्तीत जास्त उत्पादन वाढण्यास मदत होते.

# चुनखडीयुक्त जमिनीत असे करा नत्र आणि स्फुरदाचे व्यवस्थापन

पिकांना आवश्यक असणाऱ्या १६ ते १८ अन्नद्रव्यांच्या पुरवठा करताना जमिनीची भौतिक स्थिती योग्य असली पाहिजे. जमिनीचा सामू, क्षारता, सेंद्रीय कर्ब आणि चुनखडी प्रमाण योग्य असेल तर पिकाची चांगली वाढ होऊ शकते. मात्र, जमिनीमध्ये चुनखडीचे प्रमाण अधिक असल्यास पिकांना अन्नद्रव्याचा पुरवठा होण्यामध्ये अडचणी येतात. त्याचा परिणाम उत्पादनावर होतो.

चुनखडीयुक्त जमिनीमध्ये नत्राचे व्यवस्थापन :

१) चुनखडीयुक्त जमिनी अल्कलीधर्मी असल्यामुळे नत्राचे रूपांतर होण्याच्या गतीवर अनिष्ट परिणाम होतो. जमिनीतील नायट्रोसोमोनस, नायट्रोबॅक्टरसारखे जिवाणू नत्राचे अमोनिया स्वरूपामध्ये रूपांतर करतात. नायट्रेट स्वरूपातील नत्र पिके शोषून घेतात. म्हणून ही क्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. २) नायट्रिफिकेशन ही क्रिया जमिनीचा सामू ७ ते ८ च्या दरम्यान असल्यास जास्त गतीने होते. जमिनीचा सामू जर ५ ते ७.५ च्या दरम्यान असेल तर अमोनियमयुक्त नत्र खताचा वापर फायदेशीर ठरतो. परंतु जमिनीमध्ये कार्बोनेटचे प्रमाण अधिक असल्याने अमोनियम खताचा परिणाम दिसून येत नाही. उलटपक्षी नत्राचा ऱ्हास होऊन नुकसान होते. ३) जमिनीतील कॅल्शियम कार्बोनेटसोबत अमोनियमची प्रक्रिया होऊन अमोनियम कार्बोनेट तयार होते. यातील अमोनियम कार्बोनेटचे रूपांतर अमोनिया वायू, पाणी आणि कर्बवायूमध्ये होते आणि नत्राचा ऱ्हास होतो. त्यामुळे अमोनियम सल्फेट, अमोनियम फॉस्फेटसारख्या खताचा वापर चुनखडीयुक्त जमिनीत करू नये. त्याऐवजी अमोनियम नायट्रेट, अमोनियम क्लोराइडयुक्त खतांचा वापर करावा. अर्थात क्लोराइडचे जमिनीतील प्रमाण तपासून या खताचा वापर हितावह ठरतो. ४) चुनखडीयुक्त जमिनीमध्ये लोहाची कमतरता असते. त्यामुळे मुळांच्या वाढीमध्ये लेगहिमोग्लोबिन पदार्थ कमी तयार होतात.



या लेगहिमोग्लोबिनमुळेच हवेतील नत्र मुळावरील गाठीमध्ये साठविले जाते. ५) नत्र खतांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे. नत्र खतांचे रूपांतर अमोनिया वायूमध्ये होऊन ऱ्हास टाळण्यासाठी खते जमिनीच्या पृष्ठभागावर न राहता ताबडतोब मातीत मिसळली जावीत. त्यासाठी जमिनीत योग्य ओलावा असणे अथवा खते दिल्यावर जमिनीस पाणी देणे महत्त्वाचे ठरते. तसेच अमोनियाद्वारे होणारा नत्राचा ऱ्हास टाळण्यासाठी युरिया हा म्युरेट ऑफ पोटॅश, कॅल्शियम क्लोराइड किंवा ट्रिपल सुपर फॉस्फेट खतासोबत मिसळून द्यावा. ६) तसेच दाणेदार युरिया, गंधकाचे आवरण असलेला युरिया व निमावरण असलेल्या युरियाच्या वापराने नत्र खताची उपयोगिता वाढविता येते.

चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरदाचे व्यवस्थापन : १) जमिनीतील स्फुरद किंवा खताद्वारे दिलेल्या स्फुरदाची उपलब्धता जमिनीचा सामू ६ ते ७.५ च्या दरम्यान असताना अधिक असते. चुनखडीयुक्त जमिनीचा सामू ७.५ पेक्षा जास्त असल्याने पिकांना पुरेसा स्फुरद उपलब्ध होत नाही. २) स्फुरदाचे रूपांतर अत्यंत कमी विद्राव्य अशा फॉस्फेट, मॅग्नेशियम फॉस्फेट या संयुगामध्ये होते. यालाच स्फुरदाचे स्थिरीकरण म्हणतात. ३) फॉस्फेट संयुग पोयट्याच्या कणांवर किंवा चुन्याच्या कणांवर बसते आणि त्याचा डाय कॅल्शियम फॉस्फेट, ऑक्टॅकॅल्शियम फॉस्फेट संयुगाच्या रूपाने साका तयार होतो. ज्या प्रमाणात जमिनीचा सामू वाढत जातो, त्या प्रमाणात संयुगे होण्याची क्रिया वाढते. ४) स्फुरद पिकांना उपलब्ध होत नाही. त्यासाठी स्फुरद खतांची मात्रा वाढविणे आणि जमिनीस स्फुरद विद्राव्य जिवाणूंचा पुरवठा करणे हा पर्याय उरतो. सतत किंवा नेहमी चुनखडी जमिनीत सुपर फॉस्फेट, डाय अमोनियम फॉस्फेटसारख्या खतातून स्फुरद देणे योग्य नाही. कारण त्यांची विद्राव्य क्षमता ही अत्यंत कमी असते. ५) उलटपक्षी त्यांचे स्थिरीकरणच जास्त होते. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरद खते दाणेदार स्वरूपात, तसेच सेंद्रिय खतासोबत दिल्याने स्फुरदयुक्त खतांची उपयोगिता वाढते. या पद्धतीमुळे खतांचा जमिनीतील कणांशी कमी संपर्क व संयोग होतो आणि अविद्राव्यता कमी होते. ६) पिकांच्या मुळांशी वाढ वेगाने होत असताना स्फुरदयुक्त खताचा पुरवठा करणे आवश्यक आहे. चुनखडीयुक्त जमिनीत घेतलेल्या संत्रा, मोसंबीसारख्या पिकांना दर वर्षी नियमितपणे स्फुरद खत देणे आवश्यक आहे.

# दिन विशेष

## जागतिक दिवस
## उत्पादकता आठवड्याचा चौथा दिवस

### महत्वाच्या घटना

- ३९९ : सॉक्रेटिसला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.
- १७७९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात स्त्री वकिलांना खटले लढवण्यास परवानगी मिळाली.
- १८७९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात स्त्री वकिलांना खटले लढवण्यास परवानगी मिळाली.
- १९३९ : काँग्रेसच्या अध्यक्षपदी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची निवड झाल्यावर मोठा पेचप्रसंग होऊन मतभेद झाले. त्यातून पंडित नेहरुंसह कार्यकारिणीच्या बारा सभासदांनी राजीनामे दिले.
- १९४२ : दुसरे महायुद्ध सिंगापुरमध्ये ब्रिटिश सैन्याची शरणागती. ८०,००० भारतीय, ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन सैनिक युद्धबंदी.
- १९६५ : कॅनडाने नवीन ध्वज अंगिकारला.
- १९६७ : आजच्या दिवशी भारतामध्ये चौथ्या लोकसभेसाठी निवडणुका घेण्यात आल्या.
- १९७६ : मध्य प्रदेश येथे केंद्रीय कृषि अनुसंधान संस्थान ची स्थापना करण्यात आली.
- २००० : भारतीय चित्रपट दिग्दर्शक बी.आर चोपड़ा यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यात आला.
- २०१० : आजच्या दिवशी प्रसिद्ध नृत्यांगना प्रेरणा श्रीमाली यांना २००९ चा संगीत नाटक अकादमी पुरस्कारासाठी निवडल्या गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १५६४ : गॅलेलिओ गॅलिली इटालियन खगोलशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ८ जानेवारी १६४२)
- १७१० : लुई (पंधरावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १० मे १७७४)
- १८२४ : यराजेन्द्रलाल तथा राजा मित्रा बंगालमधील प्राच्यविद्या संशोधक, एशियाटिक सोसायटीचे पहिले अध्यक्ष (१८८५), भारतीय चित्रकला, शिल्पकला, राजकीय आणि सामाजिक विषयांवरील भाष्यकार (मृत्यू: २६ जुलै १८९१)
- १९२१ : ला प्रसिद्ध इतिहासकार तसेच लेखक राधाकृष्ण चौधरी यांचा जन्म.
- १९२४ : आजच्या दिवशी प्रसिद्ध चित्रकार के.जी. सुब्रह्मण्यम यांचा जन्म.
- १९३४ : स्विस संगणक शास्त्रज्ञ व पास्कल प्रोग्रामिंग लॅंग्वेज निर्माते निकालूस विर्थ याचा जन्म.
- १९४७ : भारतीय चित्रपट अभिनेता रणधीर कपूर यांचा जन्म.
- १९४९ : नामदेव लक्ष्मण ढसाळ दलित साहित्यिक (मृत्यू: १५ जानेवारी २०१४)
- १९४९ : प्रसिद्ध संस्कृत भाषेचे साहित्यकार राधावल्लभ त्रिपाठी यांचा जन्म.
- १९५२ : केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांचा जन्म.
- १९५६ : डेसमंड हेन्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू
- १९५४ : प्रसिद्ध हिंदी साहित्यकार अरुण कमल यांचे जन्म.
- १९६४ : प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवरिकर यांचा जन्म.
- १९७९ : हामिश मार्शल न्यूझीलंडचा क्रिकेटपटू
- १९८१ : भारतीय अभिनेत्री कविता कौशिक यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १५५३ : शास्त्रीय संगीतकार सुरेशबाबू माने यांचे निधन.
- १८६९ : मिर्झा ग़ालिब ऊर्दू शायर (जन्म: २७ डिसेंबर १७९७)
- १९४८ : सुभद्राकुमारी चौहान हिन्दी कवयित्री (जन्म: १६ ऑगस्ट १९०४)
- १९५३ : सुरेशबाबू माने किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक (जन्म:१९०२)
- १९८० : मनोहर दिवाण कुष्ठरोग्यांची सेवा करणारे पहिले भारतीय (जन्म: )
- १९८० : कॉम्रेड एस. एस. मिरजकर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक सदस्य व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) चे अध्यक्ष (जन्म:)
- १९८८ : रिचर्ड फाइनमन क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्स मधील मूलभूत संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक (१९६५) मिळवणारे अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (जन्म: ११ मे १९१८)
- २००८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री मनोरमा यांचे निधन.

# सेंद्रिय शेतीमध्ये निंबोळी पेंडीचे फायदे

सध्या हळू हळू सेंद्रिय शेतीचे महत्व वाढत चालले आहे. शेतातील वाढता रासायनिक खतांचा वापर यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येत असल्याने लोकांचा सेंद्रिय शेतीकडे कल वाढू लागला आहे. वाढत्या रासायनिक खतांच्या वापरामुळे लोकांना कॅन्सर सारख्या आजारांची आणि वेगवेगळ्या रोगांची लागण होत आहे. निंबोळी पेंड ही सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकरी वर्गाला खूप आवश्यक आणि फायद्याची ठरत आहे.

निंबोळी पेंडीचा शेणामध्ये वापर : सेंद्रिय शेती करण्यासाठी त्यात खत म्हणून नैसर्गिक वस्तूंचा वापर केला जातो. यामध्ये पालापाचोळा, शेण, वैरण, गांडूळखत आणि लिंबोळ्या पासून बनवलेले आणि कुजवलेले खत यांचा वापर केला जातो. लिंबाच्या झाडापासून मोठ्या प्रमाणात खत निर्मिती केली जाते. त्यास आपण ऑरगॅनिक खत असे सुद्धा म्हणतो. लिंबाचा पाळा आणि त्याच्या लिंबोळ्या या पासून निंबोळी पेंड तयार केली जाते. बाजारात याला मोठी मागणी सुद्धा आहे.निंबोळी खताचा वापर शेणामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. ऑरगॅनिक स्वरूपाचे खत असल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी या खताला आहे तसेच सेंद्रिय शेती साठी अत्यंत आवश्यक अशी ही निंबोळी पेंड आहे. निंबोळी पेंड ही फळबागायतदार कांदा उत्पादक शेतकरी आणि सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकरी वर्गाला खूप आवश्यक आहे.

निंबोळी पेंडचा शेतात वापर : निंबोळी पेंड शेणखत तसेच इतर सेंद्रिय खतांसोबत वापरण्यास अतिशय सुलभ आहे. रासायनिक खतांच्या बेसल डोसमध्ये देखील वापरता येते. निंबोळी पेंड मुळांच्या कार्यक्षेत्रात व्यवस्थित पोहचेल अशा पध्दतीने टाकावी. फ़ळझाडांमध्ये मुळांच्या जवळ ड्रिपरजवळ खड्डा घेउन त्यात निंबोळी पेंड टाकून मातीने बुजवुन घ्यावी. शेत तयार करताना देखील निंबोळी पेंडचा वापर करता येईल किंवा उभ्या पिकात निंबोळी पेंड फ़ोकुन, हाताने पसरवुन देता येते. भाजीपाला पिकामध्ये बेडमध्ये बेसल डोस टाकताना निंबोली पेंडचा वापर करता येतो. जैविक कीडनाशके- जैविक खते निंबोळी पेंडसोबत सुलभरित्या वापरता येतात. ट्रायकोडर्मा, सुडोमोनास, बॅसिलस, बिव्हेरिया, मेटारायझियम, पॅसिलोमायसिस, अ‍ॅझोटबॅक्टर, पिएसबी, केएमबी सारख्या उपयुक्त सुक्ष्मजिवांचा वापर निंबोळी पेंडीला चोळून किंवा सोबत मिक्स करुन करता येतो. प्रमाण : फ़ळझाड : १ किलो पासुन ५ किलो प्रति झाड प्रति हंगाम भाजीपाला पिके : बेसल डोसमध्ये ५०० ते १००० किलो प्रति एकरी केळी : २५० ग्राम प्रति झाड २ महिन्यांच्या अंतराने ऊस लागवडीच्या वळेस ५०० किलो ३ महिन्यांनतर ५०० ते १००० किलो

निंबोळी पेंडीचे फायदे : शेतात निंबोळी पेंड घातल्यामुळे रानातील जमिनीतील वाळवी, हुमणी आणि ढेकूण या सारख्या किड्यांपासून शेतातील पिकांचे संरक्षण होते. वेगवेगळ्या प्रकारच्या बुरशी पासून पिकांचे संरक्षण होते. आणि पिके रोगराई ला बळी पडत नाहीत. शेतात निंबोळी पेंड घातल्यामुळे पिक वाढीस फायदा होतो त्याचबरोबर पिकाला अनेक वर्षे पर्यंत अन्नपुरवठा करत राहतात त्यामुळे इतर खतापेक्षा निंबोळी पेंड फायदेशीर ठरते. उपयुक्त असणाऱ्या जमिनीतील सूक्ष्म जिवाच्या वाढीसाठी उपयुक्त असते. त्यामुळे शेतात निंबोळी पेंड घालावी. शेतात सेंद्रिय कार्बन चे प्रमाण वाढण्यास मदत होते. शेतातील उत्पन्न वाढण्यास मदत होते. आणि शेतातील मातीची सुपीकता वाढते. निंबोळी खताच्या वापरामुळे पीक उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते.



# जायकवाडीचा पाणी प्रश्न शासन दरबारी मांडणार- आ. सोळंके

## लोकलढा आंदोलकांनी मागण्यासाठी घेतली भेट

बीड। प्रतिनिधी

जायकवाडीचे पाणी वंचित शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे यासाठी शासन दरबारी शेतकऱ्यांचे म्हणणे मांडणार असल्याचे प्रतिपादन आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी केले. शेतकऱ्यांच्या पाणी संदर्भातील विविध मागण्यांसाठी लोकलढा आंदोलकांनी आमदार सोळंके यांची भेट घेतली यावेळी ते बोलत होते.

यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, देविदास चव्हाण, गणेश जाधव, महादेव रडे, माजी सरपंच गणेशराव कोळेकर व समन्वयक दिनेश गुळवे यांची उपस्थिती होती. जायकवाडीचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, उजव्या कालव्याला उप कालवा करावा यासह विविध मागण्यांसाठी सिंदफणाकाटच्या १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन उभारले आहे. या आंदोलनातील शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या भेट घेत मागण्यांची निवेदन दिले आहे. आमदार प्रकाश दादा सोळंके यांची माजलगाव येथे जाऊन या आंदोलकांनी भेट घेतली. शेतकऱ्यांचे प्रश्न विधानसभेत मांडावेत अशी मागणी ही यावेळी करण्यात आली. यावेळी बोलताना आमदार सोळंके म्हणाले की जायकवाडीचे हक्काचे पाणी वंचित भागातील शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे यासाठी आपण शासन दरबारी प्रयत्न करू. या अगोदरही जायकवाडीच्या पाण्यासाठी आपण सतत प्रयत्न करत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी गणेशराव कोळेकर व देविदास चव्हाण यांनी सिंदफनाकाटच्या शेतकऱ्यांच्या व्यथा आमदार सोळंके यांच्यासमोर मांडल्या.



### पाचशे कोटीचे काम सुरू

लोकलढा आंदोलकांशी चर्चा करताना आमदार सोळंके म्हणाले की उजवा कालवा नादुरुस्त होता त्यामुळे पाणी वाया जात होते. हा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आपण शासनाकडून साडेपाचशे कोटी रुपयांचा निधी आणला असून यातून उजव्या कालव्याचे दुरुस्तीचे काम सुरू आहे. त्याच कामाप्रमाणे लोक लढा आंदोलनाच्या मागण्यांसाठी ही निधी आणण्यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करू असे ते म्हणाले.

# सोयाबीन खरेदीला मुदतवाढ अन फरक अनुदान द्या

## खा.बजरंग सोनवणेंचे केंद्रीय कृषीमंत्री, वाणिज्य मंत्र्यांना पत्र

केज। प्रतिनिधी

नोंदणीकृत खरेदी पूर्ण होण्यापूर्वीच नाफेड खरेदी केंद्रे बंद झाल्यामुळे बीड जल्ह्यातील सोयाबीन शेतकऱ्यांसमोर मोठी समस्या नर्माण झाली आहे. सोयाबीन खरेदी कालावधी वाढवावी आणि भावान्तर योजने अंतर्गत किमतीतील फरक अनुदान स्वरुरात सोयाबीन उत्पादक शेतक-यांना देण्यात यावे, अशा मागणीचे पत्र शेतकरीपुत्र खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय कृषीमंत्री आणि वाणज्यि मंत्री यांना दिले आहे.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहाण व वाणज्यि मंत्री पियुष गोयल यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, बीड जल्ह्यात १ ऑक्टोबर २०२४ ते २५ सप्टेंबर २०२४ दरम्यान ४४,४७४ सोयाबीन शेतकऱ्यांनी नाफेडमार्फत त्यांचे उत्पादन विकण्यासाठी ऑनलाइन नोंदणी केली होती. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी ३० केंद्रांद्वारे खरेदी प्रक्रिया सुरू झाली आणि ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरू राहिली. दुर्दैवाने, या कालावधीत केवळ २०,१६९ शेतकऱ्यांना ५,१४,२०२ क्विं टल सोयाबीन विकता आले. आर्द्रतेचे कारणाने बरेच सोयाबीन परत पाठवण्यिात आले. खरेदी केंद्रे लवकर बंद झाल्यामुळे २३,२७५ नोंदणीकृत शेतकरी खरेदी प्रक्रियेत सहभागी होऊ शकले नाहीत. परिणामी, या शेतकऱ्यांना आता त्यांचे उत्पादन खुल्या बाजारात खूपच कमी किमतीत विकावे लागत आहे. जल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी चिंतातुर आहे. ही परस्थिती लक्षात घेता, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सर्व नोंदणीकृत शेतकरी त्यांचे उत्पादन नाफेडला विकू शकतील, तोपर्यंत सोयाबीन खरेदीचा कालावधी वाढवा. उत्पादन खर्च आणि सध्याच्या बाजारातील परस्थिती लक्षात घेता, वक्रिी किंमत ४,८९२ प्रति क्विंटल वरून ६,००० प्रति क्विंटल पर्यंत वाढवण्यात यावी. ज्या शेतकऱ्यांना नाफेड मार्फत त्यांचे सोयाबीन विकता आले नाही, त्यांना भावांतर योजनेअंतर्गत भावातील फरक अनुदानस्वरुपात द्यावा, जेणेकरून त्यांचे कमी आर्थिक नुकसान होईल, विशेषत: उच्च आर्द्रता आणि प्रतिकूल हवामानाचा परिणाम लक्षात घेता अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना अत्यंत आवश्यक असलेला दिलासा मिळेल, असेही पत्रात म्हटले आहे. शेतकरी पुत्र असलेले खा.बजरंग सोनवणे हे बीड जल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

# आ.संदीप क्षीरसागरांकडून बीडच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर संभाजीनगरमध्ये बैठका

## एमआयडीसी, महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात चर्चा



बीड। प्रतिनिधी

बीडच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१४) एमआयडीसी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात बैठका घेतल्या. यावेळी बीड येथील एमआयडीसीचा विकास आणि बीडच्या बायपासवरील स्लीप सर्व्हिस रोड व उड्डाणपूलांच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली.

बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होण्यासाठी नवनवीन उद्योग बीडमध्ये यावे लागतील. त्यामुळे सर्वप्रथम बीड शहरात असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांचा, बीडच्या एमआयडीसीच्या विकासाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गेल्या आठवड्यातच आ.क्षीरसागर यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार्यांसमवेत बैठक घेतली होती. यानंतर आता पुन्हा छत्रपती संभाजी नगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात आ.क्षीयसागर यांनी याच विषयावर बैठकप घेऊन एमआयडीच्या वरिष्ठ अधिकार्यांसमवेत सविस्तर चर्चा केली.

यासोबतच बीडच्या बाह्यवळण रस्ता म्हणजेच बायपासवर उड्डाणपूल नसल्यामुळे नियमितपणे अपघात होत होते. तसेच स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. याबाबतही आ.संदीप क्षीरसागरांनी शासन, प्रशासन आणि न्यायालयात पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला. आता बीडच्या बायपासवर महालक्ष्मी चौक, जिरेवाडी व छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि परळी रोड, नाथापूर रोड, इमामपूर रोड या ठिकाणांवर स्लीप सर्व्हिस रोडच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. याबाबतचा आढावाही आ.संदीप क्षीरसागर बैठकीत घेतला. संभाजीनगर येथे झालेल्या एमआयडीसीच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, प्रकल्प संचालक श्री.रवींद्र इंगोले यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात क्रिकेट स्पर्धा

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त १२ फेब्रुवारी रोजी क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.मॅचच्या सुरुवातीस दोन्ही संघातील खेळाडूंचा परिचय प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी करुन घेतला. यावेळी स्पर्धा संयोजक ग्रंथपाल प्रा.जगन्नाथ पटाईत, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, आदि उपस्थित होते.



शिक्षक संघाने नाणेफेक जिंकून निर्धारित दहा षटकांमध्ये एक बाद ७३ धावसंख्या उभारली. तर शिक्षकेत्तर संघाने हे आव्हान आठ षटकांमध्ये सहा गड्यांच्या मोबदल्यात पार केले. गणेश ससाणे यांना सामनावीर घोषित करण्यात आले.शिक्षक संघात कर्णधार डॉ. कुशाबा साळुंके, प्रा शरद पवार, डॉ. दिनेश राऊत, डॉ. विनोदचंद्र पवार, प्रा.रुपेश कोकाटे, डॉ.पवनकुमार चांडक, डॉ. कल्याण घोडके, प्रा. संजय बोंडगे, प्रा. अजिंक्य साखरे प्रा. सय्यद शानुर, अशोक कोरडे तर शिक्षकेत्तर संघात कर्णधार संतोष वाघमारे उर्फ लारा, कृष्णा शेवंते, श्रीकृष्ण यादव, गणेश ससाणे, शरद गव्हाणे, रवि काळे, नितिन सोळुंके, रोहित गायकवाड, बाबा नाइकनवरे होते शिक्षकेत्तर संघ व्यवस्थापक श्री. अंगत दराडे तर शिक्षक संघ व्यवस्थापक डॉ.गणेश पाचकोरे होते. स्पर्धेत डॉ. तानाजी आगळे व प्रा. ईरफान शेख यांनी पंचाची भूमिका पार पाडली.

लवकरच विजेत्या संघास एक हजार एकशे एक रुपयाचे पारितोषिक तर उपविजेत्या संघास पाचशे एक रुपए देऊन गौरव करण्यात येणार असल्याचे प्राचार्य आबासाहेब हांगे यांनी जाहिर केले या कार्यक्रमास महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आज बैठक

बीड। प्रतिनिधी

आज दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ वार शनिवार रोजी सकाळी ११ वा.राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची महत्त्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे होत आहे, याप्रसंगी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. या जिल्हा कार्यकारणी व कार्यकर्ता बैठकीसाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे आमदार संदीप शिरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थिती संपन्न होणार आहे.


आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगर पंचायत नगरपालिका निवडणुकी संदर्भात पदाधिकारी कार्यकर्ते महत्त्वपूर्ण बैठक संपन्न होणार आहे. तरी या बैठकीसाठी आमदार, माजी आमदार, जिल्हा पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच,सह कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# आकांक्षा कऱ्हाड यांची जलसंधारण अधिकारी म्हणून निवड

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील आकांक्षा अंगदराव कऱ्हाड यांची महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागात जलसंधारण अधिकारी ( गट - ब) म्हणून निवड झाली आहे. आकांक्षा ही अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक अंगदराव कऱ्हाड यांची कन्या असून तिने आपले शालेय शिक्षण श्रीमती गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या शाळा व महाविद्यालयीन शिक्षण योगेश्वरी महाविद्यालय,अंबाजोगाई येथे पूर्ण केले. तसेच तिने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंबाजोगाई येथून बी.ई (सिव्हिल) तर भालकी येथून .. पूर्ण केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२३ साली आयोजित करण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धा परीक्षेच्या निकालावर आधारित जलसंधारण



अधिकारी म्हणून त्यांना महाराष्ट्र शासनाने नियुक्ती पत्र दिले आहे. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाले, संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकरराव चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य तसेच संचालक मंडळातील सर्व सदस्य व इतर प्रतिष्ठित मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २७/२०२५**

**ॲड. उबाळे एम.आर.**

**अलका विरुध्द निरंक**

अर्जदार : १) अलका भ्र. अजिनाथ दिवे वयः ४३वर्षे, धंदा घरकाम, रा.आहेर धानोरा ता. जि. बीड, २) आरती पि. अजिनाथ दिवे वयः २६वर्षे, धंदाः घरकाम, रा. सदर, ३) ओंकार पि. अजिनाथ दिवे वयः २४वर्षे, धंदाः शिक्षण, रा.सदर, ४) इंदुबाई भ्र. पारसनाथ दिवे वय६०ःवर्षे, धंदाः घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र ( Heirship Certificate ) मिळणे बाबत वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे अजिनाथ पि. पारसनाथ दिवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे अजिनाथ पि. पारसनाथ दिवे रा. आहेर धानोरा ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : ११.०२.२०२३ रोजी आहेर धानोरा ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे. व अर्जदार क्र. ३ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क्र. ४ मयताची आई आहे. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत. कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अजिनाथ पारसनाथ दिवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १०/०३/२०२५.

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मौजे चुंबळी येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा समारोप नुकताच (दि. ३) संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक, बीडच्या श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचे डॉ. अरुण दैतकार आणि डॉ. शंकर धांडे हे उपस्थित होते.



समारोप कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर मनोगतात बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी मौजे चुंबळी या गावांमध्ये सात दिवसात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचा आढावा घेतला. त्याचबरोबर महादेव मंदिराच्या बाजूच्या दरीमध्ये विद्यार्थी स्वयंसेवकांनी निर्माण केलेला बंधारा, आणि या बंधार्यामुळे पावसाळ्यात त्यामध्ये पाणी साचून त्याचा होणारा फायदा याविषयी विश्लेषण केले. समारोपपर भाषणात डॉ. अरुण दैतकार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकाचे श्रमदानाबद्दल कौतुक व अभिनंदन केले. श्रमदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, ज्याच्यावर श्रमसंस्कार झालेले आहेत तो विद्यार्थी जीवनात कधीही अपयशी होत नाही म्हणून माणसाने श्रमाला सर्वश्रेष्ठ मानून त्याची लाज बाळगू नये, असा मौलिक संदेश दिला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य लक्षात ठेवून शिस्त,संस्कार,श्रम आणि मानवता या मूल्यांची जोपासना केली तर सुखी जीवनाचे स्वप्न ते सहजपणे साकार करू शकतात असे प्रेरणादायी प्रतिपादन केले. शिबिरामध्ये उपस्थित असलेल्या सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. मनीषा गाढवे, प्रा. प्रदीप मांजरे, डॉ. जालिंदर लोणके, डॉ. चंद्रशेखर बनसोडे, डॉ. सय्यद शानुर, डॉ. दिनेश राऊत, डॉ. के.टी नागरे या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विशेष शिबिरामध्ये ज्या स्वयंसेवकांनी स्वयंप्रेरणेने आणि स्वयंशिस्तीने श्रमदान केले त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. विशेषतः अनिल खेडकर, कु. शामल उगलमुगले, गीता जायभाये, भाग्यश्री नागरगोजे, अजित लगस, ओम घुले, कु. शुभांगी मोरे व कु. साक्षी खामकर यांनी शिबिरातील विविध उपक्रमात पुढाकार घेतला. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी ज्ञानदेव पवार मामा आणि युवराज कोकाटे यांचाही प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सय्यद शानुर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. मनीषा गाढवे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रीय सेवा योजनेचा ध्वज उतरवून राष्ट्रगीताने झाला. शिबिराच्या यशस्वितेसाठी चुंबळीचे सरपंच व सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन भिमाई जयंती साजरी



माजलगाव। प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतीन दि १४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या माता भिमाई यांची जयंती सांची बुद्ध विहार केसापुरी वसाहत या ठिकाणी साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात दुपारी २.०० वाजता तथागत गौतम बुद्ध,डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता भिमाई यांच्या प्रतिमांचे पुजन करुण धम्म वंदनेने करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य.डी पी वाघमारे हे होते तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, जिल्हा पर्यटन सचिव एन.बी. राजभोज,माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान,तालुका अध्यक्ष डॉ.भागवत साळवे,हे उपास्तीत होते.या ठीकाणी शामभाऊ वाघमारे,लिलाताई उजगरे,एन बी राजभोज यांनी भिमाईच्या जिवनावर मार्गदर्शन केले तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक बौद्धाचार्य डी पी पोटभरे यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका संरक्षण सचिव दयानंद साळवे यांनी केले.हा कार्यक्रमासाठी नितीन डोंगरे, भगवान डोंगरे, राजेभाऊ साळवे,मोहन काकडे,गणपत भालेराव,सिद्धांत साळवे,शरद उजगरे,पोहरेताई, वैशालीताई गायकवाड, रमाताई राजभोज,प्रभावती वाघमारे ,गायसमुद्रेताई,कौसाबाई आवचारे,यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्या ;शेतकरी रस्त्यावर

## अंबाजोगाईत मोर्चा,धरणे आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सोयाबीन खरेदी केंद्रांच्या प्रश्नावर किसान सभा मैदानात उतरली आहे. सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी,या मागणीसाठी किसान सभेने उपजिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा काढत धरणे आंदोलन करून घोषणाबाजी सरकारच्या निषेध केला. करत धोरणांचा

टक्क्यांपेक्षा जास्त सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरात जिल्ह्यात ६ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी केलेल्या ४४ हजार ७४४ पैकी फक्त २० हजार ९६९ एवढ्याच शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करून सरकारने खरेदी केंद्र बंद केले. उर्वरित ५० टक्क्यांपेक्षा जास्त सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे दिवाळे निघण्याची वेळ आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी गेल्या दोन महिन्यांपासून शासकीय खरेदी केंद्रावर सोयाबीन विकले, त्यांचे पेमेंटही अद्याप अदा झालेले नाही.त्यामुळे हे शेतकरी देखील अडचणीत आले आहेत.त्यामुळे हे आंदोलन करण्यात आले.आंदोलनात किसान सभेचे जिल्हाध्यक्ष ॲड.अजय बुरांडे,मुरलीधर नागरगोजे, काँ.उत्तरेश्वर इंगोले रवींद्र देवरवाडे, जगन्नाथ घाळे,सय्यद खुर्शीद,आत्माराम पवार, ॲड.शिवाजी कांबळे,राष्ट्रपाल पाटोले, मुक्तार भाई, व्यंकटेश देशमुख यांच्यासह शेतकरी बहुसंख्येने सहभागी झाले होते. केंद्र सरकारने सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदतवाढ देऊन संपूर्ण खरेदी होईपर्यंत खरेदी केंद्र चालू ठेवावे.संपूर्ण सोयाबीन हमीभावानेच खरेदी करावे,अन्यथा भावांतर योजनेंतर्गत फरक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा. दोन महिन्यांपासून खरेदी केलेल्या सोयाबीनचे थकीत बील तत्काळ द्यावे, आदी मागण्या करण्यात आल्या. सरकारी खरेदी केंद्र बंद असल्याने खासगी व्यापारीसुद्धा खरेदीसाठी धजावत नाहीत आणि खरेदी केलीच तर हमीभावाच्या तुलनेत अत्यंत कमी किमतीत म्हणजे




साधारण ३८०० रुपये प्रतिक्विंटलने खरेदी केला जातो.

संयमावर घाव

शासकीय खरेदीची तारीख वाढेल या आशेने शेतकऱ्यांचे डोळे लागले होते. दोन दिवसांपूर्वी पणनमंत्र्यांनी स्पष्टपणे खरेदीसाठी मुदतवाढ नसल्याचे स्पष्ट करून शेतकऱ्यांच्या संयमावरच घाव घातल्याचे आंदोलक शेतकरी म्हणाले.

**निदर्शने :** सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी या मागणीसाठी किसान सभेच्या वतीने अंबाजोगाईत नुकताच शेतकऱ्यांचा मोर्चा उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निघाला.

### खरेदी कोण करणार?

६६ शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र बंद करण्याच्या निर्णयातून या सरकारने थेट शेतकऱ्यांच्या लुटीलाच संमती दिली आहे. हे शोषण शेतकरी, त्यांची मुले सहन करणार नाहीत. हा लढा व्यापक करून सरकारला संपूर्ण सोयाबीन हमीभावाने खरेदी करायला किंवा भावांतर योजनेअंतर्गत फरक देण्यास भाग पाडू

-अजय बुरांडे,
जिल्हाध्यक्ष,किसान सभा

## रयतच्या श्री गणेश विद्या मंदिर शाळेच्या तीन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य पोलिसपदी निवड

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै. प्रशांत तुकाराम पोकळे महाविद्यालयाच्या भारत बबन पवार, सोमनाथ तुकाराम मिसाळ व कु.निकीता भिमराव भवर या तीन माजी विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य मुंबई पोलीसपदी निवड झाली आहे.हे तीनही विद्यार्थी अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर शाळेचे इ.५ वी पासूनचे विद्यार्थी आहेत.शाळेत असल्यापासून सदर विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असत.विद्यालयातर्फे आयोजित सत्कार समारंभाप्रसंगी बोलताना भारत पवारने सांगितले की शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे तसेच शाळेतील विविध सहशालेय



उपक्रमांमुळे मी हे यश मिळवू शकलो.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सोमनाथ मिसाळ याने सांगितले की जिद्द,चिकाटी व नियमित अभ्यास या गोष्टींनी कोणत्याही क्षेत्रात आपण यश मिळवू शकतो.त्याचबरोबर शिक्षकांची आज्ञा पाळणे,शालेय शिस्तीचे पालन करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.शाळेच्या तीनही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ह्या नेत्रदीपक यशाबद्दल शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके जेष्ठ शिक्षक एफ एस जाधवर,डुचे,सदावर्ते,सानप,काळे,काकडे केंद्रे,दहिफळे,श्रीमती मेढे,श्रीमती आंधळे,ग्रंथपाल सौ सुळे यांच्या हस्ते तीनही विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.संस्थेचे जनरल बाडी सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटी सदस्य ए टी पोकळे,मुरलीधर पवार तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवकांनी भारत पवार,सोमनाथ मिसाळ व कु.निकीता भवर यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## २ हजार १८३ विद्यार्थ्यांची आरटीई अंतर्गत इंग्रजी शाळेतील मोफत प्रवेशासाठी निवड

### २ हजार १८३ विद्यार्थ्यांना मिळणार इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

२०२५ - २६ या शैक्षणिक वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळामध्ये आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सोडत सोमवारी शिक्षण आयुक्तांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे काढण्यात आली. यात जिल्ह्यातील २ हजार १८३ विद्यार्थ्यांची इंग्रजी शाळेत मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत प्रवेश निश्चित करता येणार आहेत.

आरटीई प्रवेश प्रक्रियात १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत पालकांना ऑनलाईन अर्ज करण्याची मुभा देण्यात आली होती. यात जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांत २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होत्या या जागा करिता ५ हजार ७८१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. यातून आता २ हजार १८३ विद्यार्थ्यांची मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. आरटीई २५ टक्के लॉटरीद्वारे निवड झालेल्या बालकांच्या पालकांचे कागदपत्र पडताळणी करण्यासाठी तालुकास्तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात पडताळणी समिती स्थापन केल्या आहेत. ◀◀ पान २ वर

### पडताळणी समितीने चोखपणे कागदपत्रांची पडताळणी करावी - मनोज जाधव

**पडताळणी समितीने चोक पणे कागदपत्रांची पडताळणी करावी, पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी खोटी, चुकीची माहिती भरून किंवा खोटे कागदपत्र तयार करून प्रवेश निश्चित करत असतील तर निवड समितीच्या निदर्शनास आल्यास खोटी चुकीची माहिती भरून दिशाभूल केल्याप्रकरणी आरटीई २५ टक्के प्रवेश नियमानुसार रद्द करण्यात यावा . २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने पद्धतीने राबविली जात असून, यात कसलाही मानवी हस्तक्षेप नाही. तेव्हा पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील, तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये, असे आवाहन शिवसंग्राम चे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे.**



## चौकशी चालू झाल्यानंतर चालू झालेली कामे जनतेने बंद करावीत- ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या काही वर्षात पैसे उचलून कामे झाले नसल्याची तक्रारी झाल्यानंतर शासनाने त्या कामांची चौकशी लावली आहे. दरम्यान पैसे उचलूनही कामे झालेली नाहीत. मात्र ती कामे आता चालू झाली असल्याचे जनतेचे म्हणणे आहे. त्यामुळे असे असेल तर जनतेने ती कमी तात्काळ बंद करावीत आणि संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारी करून आता कामे चालू केल्याचे पंचनामे करायला लावावेत, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड . अजित एम. देशमुख यांनी केले आहे.**

गेल्या काही वर्षात बीडमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काम न करता बिले उचलण्याचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यातच जिल्ह्यात गदारोळ माजल्यानंतर या सर्व कामाची शासनाने चौकशी चालू केली आहे. चौकशीसाठी त्रिस्तरीय समिती देखील नियुक्त केली आहे.

या चौकशी समितीने आता केवळ कागदपत्र न पाहता ती कामे झाली आहेत का नाही ? याची स्पॉटवर जाऊन तात्काळ तपासणी करावी. तसेच ती कामे जर आता चालू असतील तर संबंधित गुत्तेदार, अभियंते आणि त्या-त्या भागातील संबंधित पुढाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढा हा सामान्य जनतेचा लढा आहे. भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य जनता होरपळली जाते. तमाशा बघणारे लांब थांबतात आणि भ्रष्टाचार करणारे भ्रष्टाचार करत रहातात. त्यामुळे त्यांना धडा शिकवणे देखील तेवढेच गरजेचे असते. म्हणून जनतेने ही कामे आता बंद करावीत. आणि त्या-त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना त्या ठिकाणचे पंचनामे करायला लावून त्या पंचनाम्याच्या सत्यप्रती हस्तगत करावयात. तसेच शासनाने देखील कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्षात वेगवेगळ्या टीम त्या-त्या कामाच्या भागात पाठवून वेळ, स्थळ आणि काळ दर्शवणारे फोटो आणि व्हिडिओसह त्याचे पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, असे आवाहन देखील ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

## संत तुकाराम महाराजांचा विचार मधुकर खाडे यांनी अंगिकारला

### ह.भ.प.विनोद महाराज तपसे यांचे प्रतिपादन; होळ येथे किर्तन सप्ताहास प्रारंभ

केज । प्रतिनिधी

परिस्थिती बिकट असताना मधुकर खाडे महाराज यांनी स्वतःला वारकरी संप्रदायात वाहून घेतले. त्यांनी आयुष्यभर संत तुकाराम महाराजांचा विचार अंगिकारला, असे प्रतिपादन बीड तालुक्यातील आहेरवडगाव येथील स्वामी मनसुळनाथ गडाचे महंत ह.भ.प. विनोद महाराज तपसे यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर खाडे महाराज यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज



तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असलेले ह.भ.प. विनोद महाराज तपसे हे गुरुवारी (दि.१३) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. किर्तन सेवेसाठी 'धन्य ते संसारी । दयावंत जे अंतरी ।। तेथे उपकारासाठी । आले घर ज्या लटिके वचन । नाही देही उदासीन ।। मधुरा वाणी ओठी। तुका म्हणे वाव पोटी ।।' हा संत तुकाराम महाराज यांचा अभंग घेतला होता. ह.भ.प. विनोद महाराज तपसे म्हणाले, मधुकर खाडे महाराज यांनी संत तुकाराम महाराजांचा विचार अंगिकारला होता. त्यांनी वारकरी संप्रदाय, कुस्ती, राजकीय क्षेत्रात कार्य केले. वसुधैव कुटुंबकम या उक्तीप्रमाणे ते आयुष्य जगले. प्रत्येक व्यक्ती हा माझाच आहे, असा नेहमी त्यांच्याकडे भाव असायचा. ते अजातशत्रू व्यक्तीमत्व ◀◀ पान २ वर

## डिजिटल मिडियाचे अध्यक्ष खरात उपाध्यक्ष जळके यांची निवड

अंबड । प्रतिनिधी

डिजिटल मिडियाचे अंबड अध्यक्ष गोविंद खरात तर उपाध्यक्ष आकाश जळके तर सचिव देशमुख श्रीधर कापसे यांचे निवड करण्यात आली जालना येथे शासकीय विश्राम गृह येथे बैठक संपन्न झाली यावेळी यांची निवड करण्यात आली.



डिजिटल मीडिया संघटना अंबड तालुका संघटनेचे तालुका अध्यक्ष गोविंद खरात यांचे निवड महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष राजमाने यांच्या हस्ते नियुक्ती करण्यात आली

तसेच उपाध्यक्ष आकाश जळके व सचिव श्रीधर कापसे नियुक्ती करण्यात आली यावेळी डिजिटल मिडिया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने , राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, राज्य समन्वयक इकबाल शेख पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले ,छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष रमेश नेटके आदी ची उपस्थिति होती.

## गेवराईत दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांसह सांस्कृतिक महोत्सव

### विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आज स्पर्धेचा भव्य शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद बीड व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रीडा संकुल, नगरपरिषद क्रीडागण गेवराई येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे शनिवार दि.१५ ते दि.१६ फेब्रुवारी या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवून स्पर्धेला



उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे प्रतीवर्षी आयोजन करण्यात येते. दरम्यान यावर्षीही जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, बीड व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई येथे आयोजन करण्यात आले असून सदर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे ◀◀ पान २ वर

## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलिस अधीक्षक यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करणा-या आरोपीवर गंभीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.

सांगली जिल्ह्यातील विटा येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला आहे. पत्रकार पिसाळ यांच्या वर हल्ला करणा-या आरोपीवर गंभीर कारवाई व्हावी. या मागणीसाठी

### पत्रकार पिसाळ यांच्यावर प्राणघातक हल्ला, हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा. श्री. एस. एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात पोलिस स्टेशन मध्ये निवेदने दिली जात आहेत. त्याअनुषंगाने या निवेदनात असे ही म्हटले आहे की, या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

◀◀ पान २ वर

## माजलगावातील भागवत कथेची उत्साहात सांगता

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये शिवसेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमीत्त आयोजित विवाह सोहळ्यातील श्रीमद्? भागवत कथेची सांगता दि. २४ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी झाली.

शहरामध्ये बाळु ताकट यांचे वतीने शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आगळया - वेगळया पध्दतीने शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन सामुदायिक विवाह सोहळ्याच्या ठिकाणी श्रीमद्? भागवत कथा झाली.दि.०८ फेब्रुवारीला कथेला सुरूवात झाली होती.उज्जैन मध्यप्रदेश येथील कथाकार साध्वी अनन्या दिदी शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतुन मागील सात दिवस कथा चालली.सात दिवसीय श्रीमद्? भागवत कथेतुन अनन्या दिदींनी विवीध पैलु सांगीतले तर कथेत शिव - पार्वती विवाह,कृष्ण जन्मोत्सव,गोवर्धन पर्वत,श्रीकृष्ण लिला,कंस वध, रूक्मीणी विवाह, व्दारकादीश - सुदामा भेट अशा विवीध झक्यांनी कथेने लक्ष वेधले होते.दि.१४



फेब्रुवारी शुक्रवार रोजी या भागवत कथेची सांगता झाली तर याच ठिकाणी दि.१४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान किर्तन महोत्सव,दि.१७, १८,१९ फेब्रुवारी दरम्यान तिरूपती बालाजी देवस्थान येथील श्रीनिवास कल्याणम्? महोत्सवात श्री देवी व भुदेवी भगवान स्वामी व्यंकटेश्वर सोबत दिव्य लग्नाची अनुभुती घेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक बाळु ताकट, विनोद लड्डा,राहुल मुगदिया,प्रविण चांडक,एकनाथ मस्के,जगदीश साखरे,महेश होके यांचेसह आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## किनगाव राजाची लखन-दुर्गा ठरली रांजणी केसरीची मानकरी

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात पहिल्यांदा समृद्धी साखर कारखान्यामार्फत सतीश घाटगे यांनी रांजणी येथे आयोजित भव्य बैलगाडा शर्यतीस बैलगाडा प्रेमींचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. ही भव्य दिव्य स्पर्धा सर्वांना वेगळा आनंद देऊन गेली. सहभागी प्रत्येक धुरकरी आणि बैलगाडा मालकांनी प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धेतील विजेत्या बैलगाडा मालक व धुरकरी यांचा सतीश घाटगे यांच्या हस्ते सन्मान करून बक्षीस वितरण करण्यात आले.



राज्यभरातील ११० नावाजलेल्या बैलजोडी या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. दोन दिवस ही स्पर्धा रंगातदार ठरली. ग्रामीण संकृतीचे दर्शन घडविणाऱ्या शंकरपटाचा थरार आणि रोमांचकारी शर्यतीचा आनंद या स्पर्धेमुळे बैलगाडा प्रेमींना अनुभवता आला. या स्पर्धेतील नंबर एकचे बक्षीस किनगाव राजा येथील लखन आणि दुर्गा या बैलजोडीने पटकावले. ५.८५ मिली सेकंदात या जोडीने मैदान सर करून आपल्या धन्यासाठी रांजणी केसरीचा मान पटकावला. त्यांना बक्षीस म्हणून समृद्धी कारखान्यामार्फत दुचाकी भेट देण्यात आली. तसेच दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस कानफोडी येथील महाराजा तुफान या बैलजोडीने पटकावले तर तिसरे बक्षीस शंकर डायमंड या जोडीने मिळविले. दोन्ही बैलजोडी मालकांना स्कुटी बक्षीस देण्यात आली.

या स्पर्धेत खऱ्या अर्थाने घडीवाले रणजित राठोड यांनी रंगत आणली. आपल्या बहारदार समालोचनाने त्यांनी मने जिंकली सोबत स्पर्धेतील प्रत्येक बैलजोडीचा टायमिंग अचूकपणे टीपण्याचे काम त्यांनी केले. रांजणी येथील आफरोज भाई तांबोली मित्र मंडळ, अशफाक पठाण, आमेर कुरेशी, सलमान भैय्या तांबोली, शेख सलाम, बबलू तांबोली, रमेश मोरे, शाम लगामे, रोहीत दाभाडे, अतीक तांबोली यांचे उत्कृष्ट नियोजना बद्दल श्री घाटगे यांनी कौतुक केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

A
दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष



# मुलींच्या फी माफीसाठी मंत्री चंद्रकांत पाटील क्शन मोडवर; १०० महाविद्यालयांना अचानक भेट

## पुण्यातील गरवारे महाविद्यालयाला भेट देत घेतला आढावा

पुणे । प्रतिनिधी

महायुती सरकारने घेतलेल्या मुलींच्या फी माफीसाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील क्शन मोडवर आले असून, आज त्यांनी पुण्यातील गरवारे महाविद्यालयास अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. तसेच राज्यातील १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार असल्याचा मानस ही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### महाविद्यालय प्रशासनाने यांची संयुक्त समिती स्थापन करावी

उच्च शिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने मुलींचे व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षण पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयाची राज्यात अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे, याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.



उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे; यासाठी राज्य सरकारने व्यवसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे शूल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ कोर्सेसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूद देखील करण्यात आली होती. सदर निर्णयाच्या अंमलबजावणीतील शैक्षणिक संस्थांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी शासनाने दिशानिर्देश देखील जारी केले होते. तसेच उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून भरारी पथक नेमून विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल घेतली जात होती. दर निर्णयाचा आतापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला, याचा प्रत्यक्ष आढावा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील घेण्यास सुरुवात केली असून, आज त्यांनी गरवारे महाविद्यालयास अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी थेट महाविद्यालयामधील विद्यार्थिनींशी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.

# लोणीकंद येथे वरिष्ठ ग्रीकोरोमन राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा

केसनंद, : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने नव्याने वरिष्ठ ग्रीकोरोमन राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी किताब देण्याचा निर्णय घेतला आहे. पहिली वरिष्ठ ग्रीकोरोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २२ व २३ फेब्रुवारीला लोणीकंद (ता. हवेली) येथे होणार आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने नुकतीच अहिल्यानगर येथे फ्रीस्टाईल गादी व माती महाराष्ट्र केसरी स्पर्धा, तर देवळी, वर्धा येथे महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पार पडली. त्यानंतर पुणे जिल्हा कुस्तीगीर तालीम संघाच्या सहकार्याने, पै. ओंकार कंद युवा फाउंडेशन तसेच श्री प्रदीपदादा कंद युवा मंच यांच्या वतीने लोणीकंद येथे राज्यस्तरीय ग्रीकोरोमन राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आयोजित केली आहे. यात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची मान्यता असलेल्या सहा महापालिका व ३६ जिल्हे असे एकूण ४२ जिल्हा कुस्तीगीर संघ सहभागी होणार आहेत. एकूण १० वजनी गटांमध्ये ३७५ ते ४०० कुस्तीगीर सहभाग घेतील.

या कुस्ती स्पर्धेसाठी ३० तांत्रिक अधिकारी (पंच) निवडले असून, ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी किताबासाठी ८७ ते १३० किलो हा वजनगट निश्चित करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीप भोंडवे यांनी दिली.स्पर्धेचे उद्घाटन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार राहुल कुल, कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस व सरचिटणीस पै. योगेश दोडके यांच्या हस्ते



करण्यात येणार आहे. केंद्रीय हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रेय भरणे, मंत्री जयकुमार गोरे, आमदार माऊली कटके, आमदार बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते होणार असल्याचे स्पर्धेचे स्वागताध्यक्ष व पुणे जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप कंद व स्पर्धेचे आयोजक भाजपचे पै. ओंकार हनुमंत कंद यांनी दिली.

# शोरूमची तिजोरी फोडून सव्वापाच लाखांची चोरी; नारायणगाव येथील घटना

नारायणगाव: येथील पुणे-नाशिक महामार्गालगत असलेल्या एका शोरूममध्ये चोरट्यांनी प्रवेश करून गॅस कटर व ग्राइंडरचा वापर करून तिजोरी फोडून त्यामधील ५ लाख १२ हजार रुपयांची रोख रक्कम पळविली. चोरीची ही घटना गुरुवारी (दि. १३) पहाटे २ ते ३ च्या सुमारास घडली. याप्रकरणी नारायणगाव पोलीस ठाण्यात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती नारायणगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.



येथील पुणे-नाशिक महामार्गालगत मारुती सुझुकीचे मोटार विक्रीचे शोरूम आहे. शोरूमच्या सुरक्षिततेसाठी खासगी कंपनीचे तीन सुरक्षारक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. हे सुरक्षारक्षक गुरुवारी पहाटे झोपेत असताना दोन चोरट्यांनी खिडकीतून शोरूममध्ये प्रवेश केला. शोरूममधील तिजोरी शोरूमच्या पहिल्या मजल्यावर नेली.

त्यानंतर गॅस कटर व ग्राइंडरचा वापर करून तिजोरीचा पत्रा कापला. तिजोरीतील ५ लाख १२ हजार रुपयांची रक्कम घेऊन चोरटे पसार झाले. सीसीटीव्ही फुटेजवरून दोन चोरटे आतमध्ये व इतर चोरटे बाहेरच्या बाजूने असल्याचे निष्पन्न झाले आहे. चोरीची फिर्याद कर्मचारी अभिजित भालेराव यांनी नारायणगाव पोलिस ठाण्यात दिली आहे.

दरम्यान, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा तपास सुरू केला असल्याचे सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी सांगितले. या ठिकाणी दोन सुरक्षारक्षक आणि सीसीटीव्ही कॅमेरे असताना चोरटे आतमध्ये येतात व चोरी करून जातात याचा तपास सुरक्षारक्षकांना लागत नाही त्यामुळे या चोरीमध्ये स्थानिकांचा काही हात आहे का? याबाबतदेखील संशय वाढला असून, तसा तपास केला जाणार असल्याचे शेलार यांनी सांगितले.घटनास्थळी सहायक पोलिस निरीक्षक महादेव शेलार, दत्ता ठोंबरे, स्थानिक गुन्हे शाखेचे दीपक साबळे यांनी भेट देऊन पाहणी केली. याबाबत शेलार म्हणाले की, एक महिन्यापूर्वी या ठिकाणी चोरी करण्याचा प्रकार झाला होता. त्यावेळीस काळजी घेण्याच्या सूचना सबंधितांना दिल्या होत्या. परंतु त्यांनी याबाबतची कोणतीच दखल घेतली नसल्याचे समोर आल्याचे त्यांनी सांगितले.

# महसूल विभागाच्यावतीने राजगडावर स्वच्छता मोहीम, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर राबविले अभियान

वेल्हे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर राजगड व भोर तालुका महसूल विभाग वतीने किल्ले राजगडावर स्वच्छता मोहीम शुक्रवार (ता.१४) रोजी राबविण्यात आली असल्याची माहिती भोरचे महसूल उपविभागीय अधिकारी डॉ.विकास खरात यांनी दिली.



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती संपूर्ण राज्यामध्ये विविध उपक्रमांनी साजरी केली जाते. यामध्ये राजगड तालुका महसूल विभाग व भोर तालुका महसूल विभागाच्या वतीने किल्ले राजगडावर स्वच्छता मोहीम राबवत अनोख्या पद्धतीने साजरी करण्याचे ठरवले. महसूल विभागाच्या या उपक्रमाला साथ देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन, व राजगड तालुका पत्रकार संघाचे सदस्य सकाळी साडेसात वाजता राजगडावरील पद्मावती मंदिराजवळ एकत्र येत स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी भोर उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात, राजगड तालुका प्रांताधिकारी महेश हरिश्चंद्रे,तहसीलदार निवास ढाणे,नायब तहसिलदार मयुर बनसोडे,निवडणूक नायब तहसीलदार उत्तम बडे,भोरचे निवासी नायब तहसीलदार अरुण कदम,महसूल नायब तहसीलदार अजिनाथ गाजरे,निवडणूक नायब तहसीलदार आदेश धुनाखे, अव्वल कारकून मंदार नेरेकर ,मंडल अधिकारी रतन कांबळे, राजपाल यादव,कैलास बाठे ,तलाठी रवीकरण पाटील,हेमंत घोडके,वेल्हे तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज कुंभार, रोहित नलावडे यांसह आपत्ती व्यवस्थापनचे तानाजी भोसले,पुरातत्त्व विभागाचे पहारेकरी बापू साबळे, विशाल कचरे आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

स्वच्छता मोहिमेमध्ये पद्मावती देवी मंदिर,महादेव मंदिर परिसर शेजारी असणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे टाके,पद्मावती तलाव,अंबरखाना परिसर, राजसदर,बालेकिल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबवत पंधरा ते वीस पोती प्लास्टिक बाटल्या,कागदे, खाद्यपदार्थांच्या पिशव्या अश्या कचरा जमा करण्यात आला. त्यानंतर त्या कचऱ्याची विल्हेवाटही लावण्यात आली.

# सततचा त्रास; तरुणी कंटाळली, उंदीर मारण्याची वडी खाल्ली ; धक्कादायक कारण समोर

पुणे: कोंढवा परिसरात राहणाऱ्या २० वर्षीय तरुणीला सातत्याने त्रास देणाऱ्या तरुणाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या तरुणाने पीडितेचा पाठलाग करत तिला जबरदस्तीने लग्न




करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या सततच्या छळाला कंटाळून तरुणीने राहत्या घरी उंदीर मारण्याची वडी खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोंढवा परिसरात राहणारी २० वर्षीय पीडित तरुणी गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावात होती. कारण एक तरुण तिचा सतत पाठलाग करत होता आणि जबरदस्तीने लग्नासाठी दबाव टाकत होता. आरोपी तरुण तिच्या घराजवळ, रस्त्यावर आणि कामाच्या ठिकाणी पाठलाग करत होता. त्याने तिला धमकी दिली की, माझ्याशी लग्न कर, नाहीतर तुला रस्त्यावरून उचलून नेईन. इतकेच नव्हे, तर त्याने तुझे फोटो एडिट करून व्हायरल करेल अशी धमकी देखील दिली.

या सततच्या छळाला कंटाळून तरुणीने राहत्या घरी उंदीर मारण्याची वडी खाल्ली. तरुणीच्या प्रकृतीत अचानक बिघाड झाल्याने कुटुंबीयांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. सुदैवाने तिला वेळीच वैद्यकीय मदत मिळाल्याने तिचे प्राण वाचले. घटनेची माहिती मिळताच कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. तिच्या तक्रारीच्या आधारे आरोपी तरुणाविरुद्ध छेडछाड, धमकी आणि आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# घरगुती वादातून पत्नीचा गळा आवळून खून; पती फरार

**शिरूर । प्रतिनिधी**

गणेगाव खालसा (ता. शिरूर) येथील वरुडे रस्त्यालगत घरगुती वादातून पतीने पत्नीचा गळा दाबून खून केला. मीनाबाई गांगुर्डे (वय २७) असे पत्नीचे नाव आहे. तिचा पती ज्ञानेश्वर गांगुर्डे (वय ३२) याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल झाला असून, तो फरार झाला आहे. याबाबत ताराचंद मोरे (वय २६) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वरचा ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पत्नी मीनाबाईसोबत वाद झाला होता. त्यानंतर सर्वजण झोपी गेले. पहाटे ज्ञानेश्वर घरातून बाहेर गेल्याचे शेजारील व्यक्तींनी पाहिले. मात्र, सकाळी मीनाबाई घरातून बाहेर येत नसल्याने त्यांचा चुलत भाऊ ताराचंद त्यांना आवाज देण्यासाठी गेला असता मीनाबाई मृतावस्थेत असल्याचे त्यांना दिसले. त्यांचा हात व गळा दोरीने बांधलेला होता.

याबाबतची माहिती मिळताच रांजणगाव एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, सहायक पोलीस निरीक्षक अशोक चव्हाण, उपनिरीक्षक अनिल चव्हाण, शिवाजी मुंडे, हवालदार संदीप जगदाळे, विजय सरजिने, सागर सरवदे, पोलीस पाटील श्रीकांत झांजे आदींनी घटनास्थळी धाव घेतली. ज्ञानेश्वर याने पत्नी मीनाबाईचे हात बांधून दोरीने गळा आवळून खून केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी ज्ञानेश्वरवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# देहूत वाढदिवसाच्या कार्यक्रमावेळी सराईत गुन्हेगारांचा गोळीबार, एकाचा मृत्यू

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पुणे शहर परिसरामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये गोळीबाराच्या आणि खुनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्याचं दिसून येत आहे. अशातच जुन्या वादातून एकाने गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मावळ मधील देहूरोडच्या गांधीनगर परिसरात जुन्या भांडणाच्या वादातून गोळीबाराची घटना घडली आहे. देहूरोड येथे वाढदिवसाचा कार्यक्रम सुरू असताना सराईत गुन्हेगाराकडून हा गोळीबार करण्यात आला आहे. या घटनेमध्ये एक जण गंभीर जखमी झाला होता. गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला देहूरोड येथील आधार हॉस्पिटलमध्ये उपचारांसाठी दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपचाराच्या दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. विक्रम गुरुस्वामी रेड्डी असे गोळीबारात मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. तर नंदकिशोर यादव याच्या चेहऱ्यावर मोठ्या जखमा झाल्या आहेत. गोळीबार केलेल्या आरोपींचा शोध सध्या देहूरोड पोलीस घेत आहेत.

काही दिवसांपुर्वी पुण्यातील चाकण एमआयडीसीमध्ये झालेल्या गोळीबाराने शहर हादरलं होतं. चुलत भावाने भावाची सुपारी दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. कौटुंबिक वाद आणि ईर्षा यातून जीवे मारण्याची सुपारी दिली होती. संग्राम सिंग असं सुपारी देणाऱ्या चुलत भावाचे नाव आहे. त्याने अजय सिंगची हत्या करण्यासाठी चौघांना सुपारी दिली होती. हत्येच्या उद्देशाने कैलास स्टील कंपनीच्या प्रवेशद्वारावर अजय सिंगवर गोळीबार झाला होता. गोळीबार करणाऱ्या दोघांपैकी रोहित पांडेला उत्तर प्रदेशातून अटक केल्यावर चुलत भावाचे बिंग फुटले. अजय आधी संग्राम कडे कामाला होता, अजयला या स्टील क्षेत्रात संग्रामनेचं आणलं होतं. मात्र अजय मोठा होऊ लागला, हे संग्रामला पचत नव्हतं. यातून संग्रामने अजयची सुपारी दिली आणि सगळा प्रकार घडला. या दरम्यानच्या काळात चुलत भाऊ जखमी भावाला पाहण्यासाठी हॉस्पिटलमध्ये ही आला होता. पिंपरी चिंचवड पोलीस काय-काय तपास करतायेत, याची ही माहिती तो घेत होता. मात्र अखेर पोलीस तपासात त्यानेच सुपारी दिल्याचं उघडकीस झालं. हे ऐकून अजयला मात्र विश्वास बसेना. मी ज्याला आदर्श मानत होतो, तोच माझ्या जीवावर उठला. हे उघडकीस झाल्यावर त्याला मोठा धक्का बसला.

# 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 'जेएनयू'पेक्षाही डावे', 'जेएनयू'च्या कुलगुरूंचं विधान चर्चेत

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जेएनयूपेक्षाही डावे असल्याचं वक्तव्य जेएनयूच्या कुलगुरू डॉ शांतिश्री पंडीत यांचं विधान सध्या चर्चेत आलं आहे. वासुदेव बळवंत फडके स्मृती व्याख्यान मालेतील वक्तव्याची जोरदार चर्चा आहे. 'मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात काम केलं आहे. तिथं शिकल्यावर तर कुठेही राजकारण करता येईल. त्या जोरावरच मी 'जेएनयू'मध्ये चांगलं काम करू शकले,' असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे. दहा वर्षे 'आपले' सरकार असतानाही डाव्यांची परिसंस्था सुरू असून, आपल्यालाही स्वतंत्र विचारवंत आणावे लागतील,' असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

'जेएनयूमध्ये आजपर्यंत एकही स्त्री कुलगुरू झाली नाही. ही परंपरा संघ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बदलली आहे. त्यांनी नारीशक्तीबाबत जे बोलले, ते करून दाखवले. 'जेएनयू'ने आयआयएम, आयआयटींना क्रमवारीत मागं टाकलं आहे. 'जेएनयू'ला सर्वोत्तम शैक्षणिक क्रमवारी मिळवून दिलेली मी पहिली 'संघी' आहे. अनेक लोक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वापर




करून पदे मिळवतात आणि नंतर लपवाछपवी करतात. पण, मी उघडपणे सांगते,'मी उघडपणे सांगते, मी संघाची' आहे, मी राष्ट्रसेविका समितीची आहे,' असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके स्मृति व्याख्यानात 'नव्या युगातील भारतीय समाज : संधी आणि आव्हाने' या विषयावर पंडित यांनी आपले मनोगत व्यक्त केलं.

### आपल्या क्रांतिकारकांचा आपण सन्मान राखला पाहिजे

जेएनयूच्या कुलगुरू डॉ शांतिश्री पंडीत यांनी उजव्या-डाव्यांच्या राजकारणावर बोलताना म्हणाल्या, 'डाव्यांचं कथन अतिशय मजबूत आहे. डावे लोकच क्रांतिकारी असू शकतात, असं आजपर्यंत पुढे आणण्यात आलं. मात्र, वासुदेव बळवंत फडकेही क्रांतिकारक होते, हे लोकांसमोर आणलं गेलं पाहिजे. पुण्यासारख्या बुद्धिवंतांच्या शहरातून हे कथन सुरू झालं पाहिजे. त्यासाठी लेखन करावं लागेल, बोलावे लागेल. स्वातंत्र्य चळवळ अहिंसक होती, हे दाखविण्यासाठी क्रांतिकारकांना बदनाम करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर हयात असेपर्यंत त्यांना ज्या प्रकारची वागणूक देण्यात आली, तो त्यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वाचा अपमान होता, असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

# रामलिंग यात्रेला महाशिवरात्रीपासून प्रारंभ; नियोजनासाठी शिरूर तहसिल कार्यालयात पार पडली बैठक

शिरूर : पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील शिरुर शहरासह पंचक्रोशीचे आराध्य दैवत प्रभू श्री रामलिंग महाराजांच्या महाशिवरात्रीला होत असलेल्या यात्रा महोत्सवास यंदा ५१ वर्षे पूर्ण होत असल्याने यात्रेची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. तीन दिवस चालणाऱ्या यात्रा उत्साहाच्या नियोजनाची बैठक शिरूर तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



शिरूर शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर श्री रामलिंग मंदिर असून, या मंदिरातील शिवलिंगाची स्थापना खुद प्रभू श्री रामचंद्रांनी केल्याची आख्यायिका आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला या देवस्थानची मोठी यात्रा भरते. दि. २५ फेब्रुवारीला शिरूर येथून रामलिंग येथे पालखीचे प्रस्थान होत आहे . दि. २६फेब्रुवारी रोजी रामलिंग येथे महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रेचे आयोजन केले जाते. लाखो भाविक भक्त या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येत असतात. दि. २७ फेब्रुवारी या दिवशी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजित केली जाणार आहे.यावेळी तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी आरोग्य विभाग, पंचायत समिती पोलीस विभाग, पशुसंवर्धन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण रुग्णालय शिरूर, महावितरण, रामलिंग देवस्थान, ग्रामपंचायत विभाग यांच्याकडून यात्रेसाठी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुखसुविधांची माहिती घेवून यात्रा सुरळीत व्यवस्थित पार पाडण्यासाठी सूचना केल्या आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून भव्य अशा पार्किंगची सोय केलेली आहे. तसेच आरोग्य विभाग रुग्णवाहीकेसह सज्ज राहणार आहे. यावेळी शिरूर तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, सरपंच अरुणराव घावटे, माजी सरपंच तुषार दसगुडे, उपसरपंच बाबाजी वर्पे, माजी सरपंच नामदेव जाधव, खजिनदार पोपटराव दसगुडे, ट्रस्टी बलदेवसिंग परदेशी ,रावसाहेब घावटे, नामदेवराव घावटे, शिरूर नगरपरिषदेचे राहुल पिसाळ, पशुवर्धन विभागाचे श्रीमंदिलकर सर, विस्तार आधिकारी आर .आर. राठोड ,आरोग्य विभागाचे राजेश कट्टीमनी, वाहतुक शाखेचे राजेंद्र वाघमोडे उपस्थित होते.

cmyk